रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १९ ◆ अंक ८३
www.ramprahar.com

◆ शनिवार, १० ऑक्टोबर २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## अंतरंग

एसटीच्या अतिरिक्त जमिनींच्या व्यावसायिक विकासाला वेग/२

दिवाळी सणापूर्वी तळा शहर उजळणार/५

न्यूझीलंडविरुद्ध पाच दिग्गजांचे पुनरागमन/८

## मतदार नोंदणीसाठी सोमवारपर्यंत अखेरची मुदत

**मुंबई :** एसआयआर मोहिमेंतर्गत मतदार यादीत नाव नोंदणीसाठी सोमवारपर्यंत अंतिम संधी असून शनिवार–रविवारी सर्व मतदान केंद्रांवर विशेष शिबिरे आयोजित केली आहेत, असे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोकलिंगम यांनी सांगितले. ३१ ऑगस्टच्या प्रारूप यादीत दोन कोटी नावे वगळली असून आतापर्यंत सात लाख १९ हजार मतदारांनी नमुना–६ मध्ये, तर तीन लाख ९९ हजारांनी दुरुस्तीसाठी नमुना–८ मध्ये आणि १८ हजारांनी वगळण्यासाठी नमुना–७ मध्ये अर्ज केले आहेत. १ ऑक्टोबरपर्यंत १८ वर्षे पूर्ण करणाऱ्या नवमतदारांना ऑफलाइन किंवा voters.eci.gov.in वर ऑनलाइन अर्ज करता येईल. दरम्यान, राज्यातील सर्व मतदारांनी या अंतिम संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

# राज्याचे शिक्षणमंत्री दादा भुसे यांची रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलला सदिच्छा भेट

### विद्यार्थ्यांशी साधला संवाद, शिक्षण क्षेत्रातील योगदानाची दखल





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र राज्याचे शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी शुक्रवारी (दि. ९) खारघर येथील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलला सदिच्छा भेट दिली. रायगड जिल्ह्यातील शासकीय कार्यक्रम आटोपल्यानंतर त्यांनी शाळेला भेट देत तेथील शैक्षणिक सुविधांची पाहणी केली आणि विद्यार्थ्यांशी संवाद साधला. यावेळी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या माध्यमातून शिक्षण क्षेत्रात सुरू असलेल्या कार्याची माहिती घेत त्यांनी शाळेच्या शैक्षणिक उपक्रमांचे कौतुक केले. तसेच वयाची ७५ वर्षे पूर्ण झाल्याबद्दल लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा त्यांनी सत्कार केला. भेटीदरम्यान आमदार प्रशांत ठाकूर, आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे, पनवेलचे महापौर नितीन पाटील, जिल्हा परिषदेचे अध्यक्ष मंगेश वाकडीकर, संस्थेचे व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, संचालक तथा नगरसेवक परेश ठाकूर, सभागृहनेते प्रकाश बिनेदार, संस्थेचे सचिव डॉ. एस. टी. गडदे आदी मान्यवर उपस्थित होते.

विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्याबरोबरच त्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना देणे, आधुनिक शैक्षणिक सुविधांच्या माध्यमातून शिक्षणाचा दर्जा उंचावणे आणि विद्यार्थ्यांना भविष्यातील आव्हानांना समर्थपणे सामोरे जाण्यासाठी सक्षम बनविणे आदी विषयांवर यावेळी विचारविनिमय करण्यात आला.

बदलत्या काळानुसार शिक्षण पद्धतीत होत असलेले बदल, विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी आवश्यक सुविधा आणि शाळांच्या माध्यमातून सक्षम, सुसंस्कृत व गुणवंत पिढी घडविण्याचे महत्त्व यावरही चर्चा झाली. शिक्षण हे केवळ पुस्तकी ज्ञानापुरते मर्यादित न राहता विद्यार्थ्यांमध्ये सर्जनशीलता, आत्मविश्वास, सामाजिक जाणीव, नेतृत्वगुण व जीवनमूल्यांची रुजवण करणारे असावे, या विचारातून लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था सातत्याने कार्यरत आहे. शैक्षणिक क्षेत्रात संस्थेने उभारलेल्या विविध शैक्षणिक उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण व व्यक्तिमत्त्व विकासासाठी पोषक वातावरण उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला जात आहे. लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृतमहोत्सवी वर्षाच्या पार्श्वभूमीवर त्यांच्या शैक्षणिक, सामाजिक व संस्थात्मक कार्याला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

शिक्षणाच्या माध्यमातून समाजातील विविध घटकांतील विद्यार्थ्यांना प्रगतीची संधी उपलब्ध करून देण्याच्या त्यांच्या ध्येयधोरणातून संस्थेच्या शैक्षणिक कार्याला दिशा मिळाली. याची माहिती घेत शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलची पाहणी केली व शाळेतील शैक्षणिक सुविधांची माहिती घेतली. यावेळी मंत्री दादा भुसे यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत त्यांच्या शैक्षणिक वाटचालीची माहिती घेतली.

यावेळी नगरसेवक प्रवीण पाटील, शत्रुघ्न काकडे, मधु पाटील, नरेश ठाकूर, अनिता पाटील, परेश पटेल, भाजपचे जिल्हा चिटणीस ब्रिजेश पटेल, जिल्हा उपाध्यक्ष मयुरेश नेतकर, संचालक संजय भगत, राहुल घरत, स्वप्निल ठाकूर, रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलच्या प्राचार्या राज अलोनी, सीकेटी महाविद्यालयाचे प्राचार्य एस. के. पाटील यांच्यासह संस्थेचे पदाधिकारीही उपस्थित होते.

## नर्सिंग शिक्षणामध्ये क्रांती ; ५५८ कोटींच्या विस्ताराला मंजुरी

**मुंबई : प्रतिनिधी**



राज्यातील शासकीय रुग्णालये आणि वैद्यकीय महाविद्यालयांमधील परिचारिकांची तीव्र टंचाई दूर करण्यासाठी राज्य सरकारने नर्सिंग शिक्षणाच्या क्षेत्रात आतापर्यंतचा सर्वात मोठा विस्तार करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशानुसार वैद्यकीय शिक्षण विभागाने तब्बल ५५८.७१ कोटी रुपयांच्या महत्त्वाकांक्षी आराखड्याला मंजुरी दिली असून यामुळे राज्यात बीएससी नर्सिंगच्या तब्बल २१०० अतिरिक्त जागा निर्माण होणार आहेत.

वैद्यकीय शिक्षणमंत्री हसन मुश्रीफ यांनी विधानसभेत याबाबतची माहिती देताना सांगितले की, सध्या राज्यात सुमारे २ लाख १७ हजार ६४० नोंदणीकृत परिचारिका आहेत, मात्र वाढते शहरीकरण, नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांची निर्मिती आणि खासगी आरोग्य क्षेत्रातील मागणी यामुळे ही संख्या अपुरी पडत आहे. विशेषतः ग्रामीण आणि दुर्गम भागातील रुग्णालयांमध्ये प्रशिक्षित परिचारिकांची मोठी वणवा आहे. ही पार्श्वभूमी लक्षात घेऊन सरकारने नर्सिंग शिक्षणाचा पायाच मजबूत करण्याचा निर्णय घेतला आहे. शासन निर्णयानुसार हा विस्तार तीन टप्प्यांत राबवला जाणार आहे.

पहिल्या टप्प्यात चंद्रपूर, सिंधुदुर्ग, यवतमाळ, अलिबाग (रायगड), रत्नागिरी, अमरावती, धाराशिव आणि गडचिरोली या आठ जिल्ह्यांत प्रत्येकी १०० प्रवेश क्षमता असलेली नवीन शासकीय बीएससी नर्सिंग महाविद्यालये सुरू केली जाणार आहेत. येथील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी मोठ्या शहरांत जावे लागणार नाही. या महाविद्यालयांच्या इमारत बांधकाम व अत्याधुनिक प्रयोगशाळांसाठी ३३४.८० कोटींच्या भांडवली खर्चाला मंजुरी देण्यात आली असून यवतमाळ, चंद्रपूर व सिंधुदुर्ग या तीन महाविद्यालयांना केंद्राच्या योजनेतून अतिरिक्त सहाय्य मिळणार आहे.



**पनवेल : रोटरी क्लब ऑफ पनवेल सेंट्रल व पनवेल महापालिका यांच्या संयुक्त विद्यमाने उभारण्यात येणाऱ्या फुलपाखरू उद्यानाच्या कामाची माजी सभागृहनेते तथा नगरसेवक परेश ठाकूर यांनी प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी केली. यावेळी त्यांनी कामाच्या प्रगतीचा आढावा घेतला. या माध्यमातून पर्यावरण संवर्धन, जैवविविधतेचे जतन व नागरिकांमध्ये निसर्गाविषयी विशेष जागरूकता निर्माण करण्याच्या दृष्टीने त्यांनी उपस्थित अधिकारी व रोटरी क्लबच्या पदाधिकाऱ्यांशी सविस्तर चर्चा केली.**

## भारतीय वंशाच्या नावी पिल्ले यांना शांततेचे नोबेल जाहीर

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय वंशाच्या नावाथेनम उर्फ नावी पिल्ले यांना २०२६चे शांततेचे नोबेल पारितोषिक जाहीर झाले आहे. नावी पिल्ले या दक्षिण आफ्रिकेच्या नागरिक असून २००८ ते २०१४ या काळात त्यांनी संयुक्त राष्ट्रसंघाच्या मानवी हक्कविषयक उच्चायुक्त म्हणून काम केले आहे. गेल्या वर्षीचे शांततेसाठीचे नोबेल पारितोषिक व्हेनेझुएलाच्या विरोधी पक्षनेत्या मारिया कोरिना मचाडो यांना मिळाले होते.

दरम्यान, डोनाल्ड ट्रम्प यांना नोबेल पारितोषिक न मिळाल्यामुळे खुद्द त्यांच्यासोबतच पाकिस्तानचे पंतप्रधान शाहबाज शरीफ यांचाही भ्रमनिरास झाल्याचे पाहायला मिळत आहे. शाहबाज शरीफ यांनी त्यांच्या अधिकृत एक्स हँडलवर शांततेच्या नोबेल पारितोषिकासंदर्भात पोस्ट शेअर केली होती.

## सोयीनुसार रंग बदलणे हेच काँग्रेसचे राजकारण!

### रवींद्र चव्हाणांचा राहुल गांधींवर निशाणा

**मुंबई : प्रतिनिधी**



मागील काही दिवसांपासून काँग्रेससह विरोधी पक्षांनी कथित वोटचोरीवरून निवडणूक आयोगावर आरोप–प्रत्यारोप सुरू केले असून यावरून आता भाजपने काँग्रेसवर जोरदार निशाणा साधला असून सोयीनुसार रंग बदलणे हेच काँग्रेसचे राजकारण आहे, अशी टीका भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी केली आहे. सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर पोस्ट करत त्यांनी काँग्रेसचे खासदार राहुल गांधी यांच्या भूमिकेवर आरोप केले.

रवींद्र चव्हाण यांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटले आहे की, ज्या राज्यांमध्ये तब्बल ४०–४० वर्षे काँग्रेसचा एकही मुख्यमंत्री होऊ शकला नाही, तिथे यांच्याच मित्रपक्षांची सत्ता होती. मात्र, आज पराभव समोर दिसू लागल्याने वोटचोरीचा कांगावा करणारे राहुल गांधी आणि इतर काँग्रेस नेते त्या राज्यांमधील परिस्थितीबद्दल तोंडातून ब्रदेखील काढणार नाहीत. जनतेने नाकारल्यानंतर आता लोकशाही संस्थांवर आणि मतदान प्रक्रियेवर अविश्वास दाखवणे हा काँग्रेसचा जुनाच राजकीय डाव आहे. खरंतर चोराच्या उलट्या बोंबा म्हणतात ते याच प्रवृत्तीला, असेही त्यांनी या पोस्टमध्ये म्हटले आहे.



**पनवेल : माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या सामाजिक कार्याची दाखल घेत त्यांना नुकतेच शरदरत्न जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यानिमित्त विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी लोकनेते रामशेठ ठाकूर यांची भेट घेऊन अभिनंदन केले. प्रीतम भगत, आदित्य भगत, मंदार भगत, विवेक भगत, डॉ. संतोष जाधव, गणेश म्हात्रे, परेश पाटील, कुणाल पाटील, अनिकेत भोईर, विनय पाटील, शुभम वाफारे, कैलास गोंधळी, अंकुश ठाकूर, अशोक म्हात्रे, दर्शन गोंधळी आदींनी लोकनेते रामशेठ ठाकूर यांना पुष्पगुच्छ प्रदान करीत जीवनगौरव पुरस्कार मिळाल्याबद्दल शुभेच्छा दिल्या.**

## जंतरमंतरवरील आंदोलनात महिला पोलिसांना मारहाण

### भाजपकडून माफीची मागणी

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**



नवी दिल्लीमध्ये निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखालील आंदोलनादरम्यान महिला पोलीस कर्मचाऱ्यांसोबत गैरवर्तन झाल्याचा गंभीर आरोप सरकारने केला आहे. सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी सुप्रीम कोर्टात यासंदर्भात माहिती दिली.

आंदोलनादरम्यान महिला पोलीस अधिकाऱ्यांशी असभ्य वर्तन करून त्यांना मारहाण तसेच अपशब्दही वापरण्यात आले, असा दावा त्यांनी केला. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या हकालपट्टीची मागणी व वोटचोरीच्या निषेधार्थ इंडिया आघाडीचे खासदार जंतरमंतरकडे जात असताना हा सगळा राडा झाला होता.

बुधवारच्या आंदोलनानंतर भाजपने काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्यावर गंभीर आरोप केले. अशोक रोडवर आंदोलन सुरू असताना एका महिलेला बाजूला करताना राहुल गांधी यांनी महिला पोलीस अधिकाऱ्याला धक्काबुक्की केल्याचा आरोप भाजपचे प्रवक्ते प्रदीप भंडारी यांनी केला. तसेच भाजपचे प्रवक्ते गौरव भाटिया यांनीही याप्रकरणी जाहीर माफी मागण्याची मागणी केली आहे. या सर्व आरोपांवर काँग्रेसकडून कोणतीही प्रतिक्रिया आलेली नाही.

## नवरात्रोत्सवानिमित्त बाजारपेठा सजल्या

### रंगीबेरंगी घट, नक्षीदार कलशांना मागणी



**पनवेल : वार्ताहर**

शारदीय नवरात्रोत्सवाला सुरुवात होण्यास अवघे काही तास शिल्लक असल्याने पनवेल शहरासह तालुक्यातील बाजारपेठा घटस्थापनेच्या पूजा साहित्याने सजल्या असून रंगीबेरंगी मातीचे घट, नक्षीदार कलश आणि विविध पूजा साहित्य खरेदी करण्यासाठी नागरिकांची लगबग सुरू झाली आहे. यंदा बाजारात लाल, पिवळा, हिरवा, गुलाबी आणि केशरी रंगांतील आकर्षक मातीचे घट उपलब्ध झाले आहेत.

या घटांवर नक्षीकाम, कुंदन, मिरर वर्क आणि मोत्यांची सजावट करण्यात आली आहे. पारंपरिक तांब्या–पितळेच्या कलशांनाही मागणी आहे. पनवेल शहरासह नवीन पनवेल, कामोठे, कळंबोली, खांदा कॉलनी, तळोजा आणि तालुक्यातील विविध बाजारपेठांमध्ये नवरात्रीच्या खरेदीची लगबग वाढली आहे. घटस्थापनेसाठी लागणारे मातीचे घट, धान्य, पूजेची माती, नारळ, विड्याची पाने, सुपारी, मौली, हळद–कुंकू आणि फुलांच्या माळा दुकानांमध्ये उपलब्ध आहेत.

घटाभोवती सजावट करण्यासाठी रांगोळी, फुलांचे तोरण, देवीची लाल चुनरी, रंगीत वस्त्रे, कृत्रिम फुले, सजावटीची पाने आणि दिव्यांच्या माळांनाही मागणी आहे. नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर विक्रेत्यांनी विविध प्रकारचे पूजा साहित्य विक्रीसाठी उपलब्ध करून दिले आहे. घटस्थापनेच्या मुहूर्तावर खरेदी वाढण्याची अपेक्षा व्यापाऱ्यांकडून व्यक्त केली जात आहे.



# एसटीच्या अतिरिक्त जमिनींच्या व्यावसायिक विकासाला वेग -मंत्री प्रताप सरनाईक

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या ताब्यातील अतिरिक्त जमिनींचा अधिकाधिक व्यावसायिक वापर करून महामंडळाचे उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. एसटी महामंडळाच्या अतिरिक्त जमिनींचा सार्वजनिक–खासगी भागीदारी (पीपीपी) तत्वावर विकास करण्यास आणि त्यासाठी ४९+४९ वर्ष असा एकूण ९८ वर्षांपर्यंतचा भाडेपट्टा करण्यास शासनाने मान्यता दिली आहे. त्यामुळे एसटीच्या मालमत्तेतून नियमित व दीर्घकालीन उत्पन्न मिळविण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांच्या अध्यक्षतेखाली या प्रक्रियेसाठी उच्चस्तरीय समिती स्थापन करण्यात आली आहे. या निर्णयामुळे एसटीच्या आर्थिक बळकटीकरणाला मोठी चालना मिळणार असून, महामंडळाच्या जमिनींचा



पीपीपी तत्वावरील विकासासाठी अंतिम टप्प्यात असलेल्या व्यवहार्य प्रकल्पांना महाराष्ट्र सार्वजनिक–खासगी भागीदारी धोरण, २०२६ अंतर्गत काही सवलती देण्याची तरतूदही करण्यात आली आहे. प्रकल्पाच्या निविदा, सवलत करारनामा आणि व्यवहार्य संरचनेसाठी संबंधित समितीची मान्यता घेण्यात येणार आहे. तसेच प्रत्येक प्रकल्पाच्या अंतिम निविदेला मुख्यमंत्री स्तरावर मान्यता घेणे बंधनकारक राहणार आहे.

एसटी महामंडळाच्या आर्थिक स्थितीचा विचार करून, दीर्घकालीन भाडेकरारापेक्षा अपफ्रंट प्रीमियमसह ९० वर्षांचा लीज मॉडेल महामंडळासाठी अधिक फायदेशीर ठरू शकतो, अशी शिफारस सुबोधकुमार समितीने केली होती. त्यानंतर शासनाने भाडेपट्ट्याचा कालावधी वाढवून (४९+४९) ९८ वर्षांपर्यंत करण्यास मान्यता दिली आहे.

महामंडळाच्या राज्यभरातील सुमारे ८५० ठिकाणी ३५०० एकरांपेक्षा अधिक जमीन उपलब्ध आहे. यातील मोठ्या प्रमाणातील जमीनी मोक्याच्या ठिकाणी आहे.या जमिनींचा व्यापारी, निवासी, औद्योगिक तसेच अन्य व्यावसायिक कारणांसाठी नियोजनबद्ध विकास केल्यास महामंडळाला आगावू प्रीमियम सह मोठ्या प्रमाणावर नियमित उत्पन्न मिळू शकते. तसेच व्यवसायिक संकुलात देखील महामंडळाला हिस्सा मिळणार असल्याने त्यातून नियमित वार्षिक उत्पन्न देखील महामंडळाला प्राप्त होणार आहे.

याबाबत परिवहन मंत्री प्रताप सरनाईक म्हणाले, "एसटी महामंडळाच्या मालकीच्या जमिनी हा महामंडळाचा मौल्यवान ठेवा आहे. या जमिनींचा विनियोग केवळ तात्पुरत्या उत्पन्नासाठी नव्हे, तर एसटीच्या दीर्घकालीन आर्थिक सक्षमीकरणासाठी करण्यात येणार आहे. पारदर्शक निविदा प्रक्रिया, योग्य व्यावसायिक नियोजन आणि पीपीपी तत्वाच्या माध्यमातून या मालमत्तेतून महामंडळाला अधिकाधिक उत्पन्न मिळवून देणे हा आमचा प्रमुख उद्देश आहे."

"एसटीच्या प्रवासी सेवेला अधिक सक्षम करण्यासाठी आर्थिक स्वावलंबन आवश्यक आहे. त्यामुळे महामंडळाच्या अतिरिक्त जमिनींचा योग्य पद्धतीने विकास करून त्यातून मिळणारे उत्पन्न एसटीच्या सेवा–सुविधांच्या बळकटीकरणासाठी उपयोगात आणले जाईल," असेही सरनाईक यांनी स्पष्ट केले.

# पोर्ट आणि डॉक कामगारांचा मोठा विजय : प्रमुख मागण्यांना मान्यता



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

देशभरातील प्रमुख बंदरे (पोर्ट्स) आणि डॉक कामगारांसाठी एका महत्त्वपूर्ण घडामोडीत, इंडियन पोर्ट्स असोसिएशन व्यवस्थापनाने आज न्यू दिल्ली येथे झालेल्या पहिल्या 'पीएलआर समितीच्या बैठकीत' पीएलआर संदर्भातील फेडरेशनच्या प्रमुख मागण्यांना तत्त्वतः मान्यता दिली आहे.

या उच्चस्तरीय बैठकीचे अध्यक्षपद श्री सुशील कुमार सिंह, (अध्यक्ष, IPA आणि अध्यक्ष, दीनदयाळ पोर्ट ऑथॉरिटी) यांनी भूषवले. या बैठकीला श्री विकास नरवाल, (व्यवस्थापकीय संचालक,) यांच्यासह जेएनपीए, श्यामा प्रसाद मुखर्जी पोर्ट (कोलकाता), विशाखापट्टणम यांसारख्या देशातील सर्व प्रमुख बंदरांचे अध्यक्ष आणि उपाध्यक्ष उपस्थित होते.

कामगारांच्या वतीने 'भारतीय पोर्ट अँड डॉक मजदूर महासंघ'चे अध्यक्ष श्री श्रीकांत राय आणि सरचिटणीस श्री सुरेश पाटील यांच्यासह इतर सर्व मान्यताप्राप्त फेडरेशनच्या प्रतिनिधींनी कामगारांच्या मागण्या आणि प्रश्न अत्यंत प्रभावीपणे मांडले.

या सकारात्मक चर्चेनंतर, IPA व्यवस्थापनाने आश्वासन दिले आहे की मान्य केलेल्या मुद्द्यांवर आधारित ड्राफ्ट एग्रीमेंट (मसुदा) लवकरच तयार करून सर्व फेडरेशन्सना पाठवण्यात येईल. या बैठकीतील निर्णयांचे स्वागत करताना, भारतीय पोर्ट अँड डॉक मजदूर महासंघाचे सरचिटणीस सुरेश पाटील म्हणाले, "आजची बैठक आमच्या पोर्ट आणि डॉक कामगारांचे हक्क सुरक्षित करण्याच्या दिशेने टाकलेले एक अत्यंत सकारात्मक पाऊल आहे. व्यवस्थापनाने आमच्या मुख्य मागण्या मान्य केल्या आहेत.

# ४० वर्षे निजामपूर विकासापासून दूर; नागरिकांत असंतोष, आय झोन नको, आर झोन द्या

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव तालुक्यातील निजामपूर परिसराच्या विकास आराखड्यात 'आय झोन' ऐवजी 'आर झोन' चा समावेश करावा, अशी मागणी आता स्थानिक नागरिकांनी पुन्हा एकदा आक्रमकपणे लावून धरली आहे. गेल्या अनेक वर्षांपासून पालकमंत्री भरतशेठ गोगावले, महिला व बाल विकास मंत्री अदिती तटकरे तसेच खासदार सुनील तटकरे यांच्याकडे निवेदने देऊन नागरिकांनी 'आय झोन' नको, 'आर झोन' द्या, अशी मागणी केली आहे. ४० वर्षे पासून निजामपूरला आय झोन टाकला असल्याने गेली दहा दशके मागे निजामपूर विकासा पासून दूर फेकला गेला आहे. त्यामुळे विकासाला चांगलीच खेळ बसली आहे. मात्र, या प्रश्नावर लोकप्रतिनिधीतून अद्याप ठोस निर्णय अथवा स्पष्ट भूमिका पुढे न आल्याने नागरिकांमध्ये कमालीची नाराजी पसरली आहे.

निजामपूर परिसराचा झपाट्याने विस्तार होत असताना येथील जमीन वापराचे नियोजन हा भविष्यातील विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा प्रश्न बनला आहे. स्थानिक नागरिकांच्या घरांच्या गरजा, वाढती लोकसंख्या, नव्या पिढीचे स्थायिक होणे आणि परिसरात निर्माण होणाऱ्या व्यावसायिक संधी लक्षात घेता निवासी क्षेत्रासाठी अधिक जागा उपलब्ध होणे आवश्यक असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. नागरिकांच्या मते, 'आर झोन' उपलब्ध झाल्यास निवासी बांधकामाला नियोजनबद्ध स्वरूप मिळू शकते. जमीन निवासी वापरासाठी उपलब्ध झाल्याने अधिकृत बांधकाम, घरकुल निर्मिती आणि निवासी वसाहतींच्या विकासाला चालना मिळण्याची शक्यता आहे. तसेच जमीन 'एनए' करण्याची प्रक्रिया




सुलभ होऊन मालमत्तेचा आर्थिक वापर वाढू शकतो, असे नागरिकांचे म्हणणे आहे. याशिवाय नियोजनबद्ध टाऊन प्लॅनिंगला चालना मिळाल्यास रस्ते, पाणीपुरवठा, गटारे, वीज, स्वच्छता, सार्वजनिक सुविधा यांचे भविष्यातील नियोजन करता येऊ शकते. निवासी क्षेत्राचा विस्तार झाल्यास राष्ट्रीयीकृत बँका व इतर वित्तीय संस्था कडून पात्रते नुसार गृहकर्ज किंवा मालमत्तेशी संबंधित कर्ज सुविधा मिळण्याच्या शक्यता वाढू शकतात. त्यामुळे स्थानिकांच्या घरांच्या गरजा पूर्ण करण्या सोबतच जमिनीच्या आर्थिक वापरालाही चालना मिळू शकते.

'आर झोन' च्या माध्यमातून निजामपूर परिसराचा विस्तार नियोजनबद्ध पद्धतीने झाल्यास बाहेरील बिल्डर, व्यावसायिक आणि गुंतवणूकदार येथे येण्याची शक्यता आहे. त्यातून बांधकाम व्यवसाय, दुकाने, सेवा उद्योग, लघुउद्योग, कार्यालये तसेच विविध व्यावसायिक उपक्रमांना चालना मिळू शकते. परिणामी स्थानिक तरुणांसाठी रोजगार आणि स्वयंरोजगाराच्या नव्या संधी निर्माण होऊ शकतात. निजामपूरचा विकास केवळ घरबांधणी पुरता मर्यादित न राहता त्याला आर्थिक आणि व्यावसायिक केंद्राचे स्वरूप प्राप्त होऊ शकते. मात्र, हा विकास अनियंत्रित पद्धतीने न होता सक्षम नगररचना आणि पायाभूत सुविधांच्या नियोजनासह झाला पाहिजे, अशी नागरिकांची अपेक्षा आहे. दरम्यान, 'आय झोन' म्हणजे संस्थात्मक वापरासाठी राखीव क्षेत्र. अशा क्षेत्रातून शैक्षणिक संस्था, आरोग्य सुविधा, प्रशासकीय कार्यालये, सार्वजनिक संस्था किंवा इतर आवश्यक संस्थात्मक प्रकल्पांसाठी जमीन उपलब्ध होऊ शकते. त्यामुळे 'आय झोन' पूर्णपणे निरुपयोगी आहे, असे म्हणता येणार नाही. मात्र, निजामपूरच्या सध्याच्या गरजा आणि भविष्यातील नागरी विस्तार लक्षात घेता संस्थात्मक क्षेत्राचे प्रमाण, प्रत्यक्ष गरज आणि उपलब्ध जागेचा वापर याचा फेरआढावा घेणे आवश्यक आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून नागरिकांनी लोकप्रतिनिधींकडे निवेदने देऊन 'आय झोन'मध्ये बदल करून 'आर झोन' करण्याची मागणी केली आहे. मात्र, या मागणीवर अद्याप ठोस निर्णय झालेला नसल्याने नागरिकांमध्ये अस्वस्थता आहे. त्यामुळे पालकमंत्री भरतशेठ गोगावले, मंत्री ना. अदिती तटकरे आणि खासदार सुनील तटकरे यांनी निजामपूरच्या या प्रश्नाकडे गांभीर्याने पाहून नागरिकांशी संवाद साधावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# शिक्षक अनेक पिढ्यांचा शिल्पकार असतो, त्यांना कधीही विसरू नका -नमिता घारे

**कर्जत : प्रतिनिधी**

'आपण कितीही मोठा झाला असलो तरी आपल्याला दिशा देणारे कोण असतील तर ते शिक्षक असतात. शिक्षक आपल्याला नुसते शिकवत नसतात तर ते आपल्यामध्ये आत्मविश्वास निर्माण करत असतात. आपल्याला पुढे जाण्यासाठी नेहमीच प्रोत्साहित करत असतात. आपल्याला पुढे जाण्यासाठी संधी देत असतात. शिक्षक अनेक पिढ्यांचा शिल्पकार असतो स्वतःच्या सुखापेक्षा विद्यार्थ्यांचे हित पहात असतो. विद्यार्थी मोठा झाला की शिक्षकाचे हृदय भरून येते. माझी एकच अपेक्षा आहे की आपला विद्यार्थी इंग्लिश शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांपेक्षा कमी नाही. असे काम आपल्याला करायचे आहे. विद्यार्थ्यांनो तुम्ही कितीही मोठे झालात तरी आई – बाबा आणि शिक्षकांना कधीही विसरू नका. सुधाकर घारे जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष असताना त्यांनी शिक्षकांसाठी केलेला सन्मान सोहळा मलाही करण्याची संधी मिळाली. हे मी माझे भाग्य समजते.' असे प्रतिपादन पंचायत समिती सभापती नमिता घारे यांनी येथे केले.

पंचायत समितीच्या शिक्षण विभागाच्या वतीने तालुक्यातील शिष्यवृत्तीधारक



विद्यार्थ्यांचा गुणगौरव आणि जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील व माध्यमिक विद्यालयातील शिक्षकांच्या सन्मान सोहळ्याचे आयोजन साईकृपा शेळके मंगल कार्यालयाच्या सभागृहात आयोजन करण्यात आले होते. समारंभाचे उदघाट्न जिल्हा परिषद समाज कल्याण सभापती नारायण डामसे यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी सभापती नमिता घारे, उपसभापती चित्रा ठाकरे, जिल्हा परिषद सदस्य सुनीता मोरे, सुवर्णा ठाकरे, पंचायत समिती सदस्य महेश खारीक, नितीन धुळे, कमला शिंगवा, कविता पादीर, नमिता श्रीखंडे, सुषमा पवाळी, शालेय समिती अध्यक्ष प्रभाकर बडेकर यांच्यासह विस्तार अधिकारी व केंद्र प्रमुख उपस्थित होते. आनंद कराळे व संजय देशमुख यांनी आपल्या सहकाऱ्यांच्या सोबतीने ईशास्तवन स्वागत गीत सादर करून वातावरण निर्मिती केली. जेष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

सुरुवातील काही शिक्षकांनी पूर्वीचे विद्यार्थी व पालक कसे होते? आणि आत्ताचे विद्यार्थी व पालक कसे आहेत? याबाबत नाट्य सादर केले. त्यानंतर गट शिक्षण अधिकारी अनंत खैरे यांनी उपस्थितांचे स्वागत करून प्रस्ताविकात 'हा सोहळा निष्ठेचा व योगदानाचा आहे. तसेच ऊर्जा व प्रेरणा घेऊन जाणारा आहे. सर्व शिक्षक संघटना यामध्ये सहभागी झाल्याचा मला आनंद आहे. कर्जत तालुका शिक्षणाच्या बाबतीत आज दुसऱ्या क्रमांकावर आहे. तो सर्वांच्या सहकार्याने प्रथम क्रमांकावर आणण्याचा आम्ही प्रयत्न करू.' असा विश्वास व्यक्त केला.

यावेळी १०३ शिक्षवृत्तीधारक विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह व भेटवस्तु देऊन सन्मानित करण्यात आले तर तालुक्यातील सुमारे एक हजार चारशे शिक्षकांना सन्मानित करण्यात आले. याप्रसंगी समन्वयक प्रदीप सुर्वे, केंद्र प्रमुख विशाल धानके, सागर दिवेकर, देवीदास जाधव, माधुरी पाटील, बालासाहेब पालवे, शशिकांत पालकर, भाऊसाहेब खेमनार, पद्माकर म्हात्रे आदी उपस्थित होते.



खोपोली : 'राज्यस्तरीय शालेय कुस्ती स्पर्धा २०२६–२७' चे उद्घाटन शनिवार, १० ऑक्टोबर रोजी सायंकाळी ४:०० वाजता स्वदेशी स्पोर्ट्स सेंटर, महाराजा हॉल, खोपोली (ता. खालापूर, जि. रायगड) येथे होणार आहे.त्याची पहाणी करण्यासाठी पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते तथा नगरसेवक परेश ठाकूर यांनी भेट दिली. यावेळी खोपोलीचे उपनगराध्यक्ष विक्रम साबळे यांनी महाराष्ट्र राज्य बॅडमिंटन असोशिएशनचे उपाध्यक्ष म्हणून निवड झाल्याबद्दल त्यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले.

# रसायनी पाताळगंगा परिसरात पत्रकार भवन उभारण्याच्या मागणीला सकारात्मक प्रतिसाद

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील रसायनीपाताळगंगा औद्योगिक व ग्रामीण परिसरातील पत्रकारांसाठी स्वतंत्र 'पत्रकार भवन' उभारण्यात यावे, यासाठी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे कोकण विभागीय अध्यक्ष राकेश खराडे यांनी पुढाकार घेतला आहे. या मागणीसाठी राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्यासह जिल्हाधिकारी रायगड, जिल्हा बांधकाम विभाग, खालापूर तहसील कार्यालय, पंचायत समिती खालापूर तसेच विविध स्थानिक स्वराज्य संस्था आणि औद्योगिक आस्थापनांकडे पत्रव्यवहार करून शासकीय जागा उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली आहे. या मागणीला शासन स्तरावरून सकारात्मक प्रतिसाद मिळाल्याने पत्रकार भवन उभारणीच्या आशा पल्लवित झाल्या आहेत.

रसायनीपाताळगंगा हा रायगड जिल्ह्यातील महत्त्वाचा औद्योगिक परिसर असून, येथील सामाजिक, शैक्षणिक, आरोग्य, पर्यावरण, औद्योगिक तसेच जनहिताचे प्रश्न प्रशासन आणि शासनापर्यंत पोहोचविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य स्थानिक पत्रकार सातत्याने करीत आहेत. मात्र, परिसरातील पत्रकारांसाठी स्वतंत्र पत्रकार भवन किंवा पत्रकार कक्ष उपलब्ध नसल्याने पत्रकार परिषद, बैठका, वृत्तसंकलन, प्रशासकीय संवाद आणि विविध सामाजिक उपक्रमांच्या आयोजनासाठी कायमस्वरूपी जागेची आवश्यकता भासत आहे.

या संदर्भात राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, जिल्हाधिकारी रायगड–अलिबाग, जिल्हा बांधकाम विभाग रायगड, तहसीलदार खालापूर, गटविकास अधिकारी पंचायत समिती खालापूर, ग्रुप ग्रामपंचायत वासांबेमोहोपाडा तसेच परिसरातील इतर ग्रामपंचायती, एमआयडीसी रसायनीपाताळगंगा आणि बीपीसीएल लिमिटेड आदी संबंधित शासकीय कार्यालये, स्थानिक स्वराज्य संस्था व औद्योगिक आस्थापनांकडे पत्रव्यवहार करून पाठपुरावा करण्यात आला आहे.

शासन स्तरावरून या मागणीला सकारात्मक प्रतिसाद मिळाल्याने पत्रकार भवनासाठी जागा उपलब्ध होण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण पाऊल पडल्याचे मानले जात आहे. आता संबंधित विभागांनी जागेची पाहणी करून योग्य शासकीय जागा निश्चित करावी आणि पुढील प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण करावी, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयात मराठी अभिजात भाषा सप्ताह साजरा

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालय, खारघर येथे दिनांक ८ ऑक्टोबर रोजी मराठी अभिजात भाषा दिनानिमित्त विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये मराठी भाषेविषयी प्रेम, अभिमान आणि आदर निर्माण व्हावा, तसेच त्यांच्या भाषिक, साहित्यिक व सर्जनशील कौशल्यांना प्रोत्साहन मिळावे, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश होता. या उपक्रमांतर्गत



विद्यार्थ्यांसाठी वक्तृत्व स्पर्धा, निबंध लेखन स्पर्धा आणि मराठी प्रश्नमंजुषा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

या स्पर्धांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना आपल्या विचारांची प्रभावी मांडणी करण्याची, लेखनकौशल्य विकसित करण्याची आणि मराठी भाषेतील साहित्य, शब्दसंपदा व सांस्कृतिक परंपरेची माहिती जाणून घेण्याची संधी उपलब्ध झाली. मराठी भाषेला लाभलेली समृद्ध साहित्यिक परंपरा, ऐतिहासिक वारसा आणि सांस्कृतिक वैभव यांची विद्यार्थ्यांना जाणीव करून देणे, तसेच नव्या पिढीमध्ये मराठी भाषेच्या संवर्धनाची भावना रुजवणे, हे या उपक्रमाचे वैशिष्ट्य होते.विद्यालयाच्या भाषा मंडळाच्या वतीने आयोजित या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना आपल्या मायमराठीच्या सामर्थ्याची ओळख करून घेण्याची आणि विविध स्पर्धांमधून आपल्या सुप्त गुणांना वाव देण्याची संधी मिळाली. "लाभले आम्हांस भाग्य बोलतो मराठी" या भावनेतून विद्यार्थ्यांनी मराठी भाषेचा अभिमान बाळगावा आणि तिच्या जतन व संवर्धनासाठी योगदान द्यावे, असा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

# कळंबोली जंक्शन वर्षभरात कोंडीमुक्त होणार; ४२ टक्के काम पूर्ण

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने (एनएचएआय) 'कळंबोली जंक्शन सुधारणा प्रकल्प' हाती घेतला आहे. या प्रकल्पाचे काम महाराष्ट्र राज्य रस्ते पायाभूत सुविधा विकास महामंडळाच्या (एमएसआयडीसी) माध्यमातून करण्यात येत आहे. हा प्रकल्प जून २०२६ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित होते. मात्र या प्रकल्पास विलंब झाला असून आता एमएसआयडीसीने कामाला वेग दिला आहे.



(संग्रहित छायाचित्र)

आजघडीला या प्रकल्पाचे ४२.१४ टक्के काम पूर्ण झाले असून उर्वरित काम वर्षभरात पूर्ण करून या प्रकल्पाअंतर्गत बांधण्यात आलेले आठ पूल आणि दोन भुयारी मार्ग सेवेत दाखल करण्याचे एमएसआयडीसीचे नियोजन आहे. त्यामुळे कळंबोली जंक्शन नोव्हेंबर २०२७ मध्ये वाहतूक कोंडीमुक्त होण्याची शक्यता आहे.

कळंबोली जंक्शनला अनेक रस्ते, महामार्ग येऊन मिळतात. मुंबई-पुणे द्रुतगती महामार्ग, शीव-पनवेल महामार्ग, जेएनपीटी, राष्ट्रीय महामार्गासारख्या महामार्गांचा यात समावेश आहे. त्यामुळे कळंबोली जंक्शन येथे प्रचंड वाहतूक कोंडी होते. वाहतूक कोंडी दूर करून प्रवास अतिजलद करण्यासाठी एनएचएआयने कळंबोली जंक्शन सुधारणा प्रकल्प हाती घेतला.

या प्रकल्पाच्या अंमलबजावणीची जबाबदारी एमएसआयडीसीकडे सोपविण्यात आली. एमएसआयडीसीने निविदा प्रक्रिया राबवून ठाकूर इन्फ्राप्रोजेक्ट्स प्रायव्हेट लिमिटेडची कंत्राटदार म्हणून नियुक्ती केली. प्रकल्पाच्या कामास २०२४ मध्ये सुरुवात झाली. अंदाजे ४८२ कोटी रुपये खर्चाच्या या प्रकल्पाचे काम जून २०२६ मध्ये पूर्ण होणे अपेक्षित होते. मात्र काही कारणांमुळे प्रकल्प लांबणीवर पडला. आता कामास वेग देण्यात आला असून आतापर्यंत प्रकल्पाचे ४२.१४ टक्के काम पूर्ण झाल्याची माहिती एमएसआयडीसीतील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी 'लोकसत्ता'ला दिली.

कळंबोली जंक्शन सुधारणा प्रकल्पाअंतर्गत १५.५३ किमीच्या मार्गादरम्यान ३ किमीचे आठ उड्डाणपूल बांधण्यात येत आहेत. तर दोन भुयारी मार्ग बांधण्यात येत आहेत. हे उड्डाणपूल सेवेत दाखल झाल्यानंतर मुंबई-पुणे द्रुतगती महामार्ग असो वा इतर महामार्ग, त्या त्या मार्गावर जाणे सोपे होणार आहे. त्यामुळे कळंबोली जंक्शनवरील वाहतूक कोंडी दूर होण्यास मदत होणार आहे. हा प्रकल्प नवी मुंबईकरांच्या दृष्टीने महत्त्वाचा मानला जात आहे. वर्षभरात पूर्ण करून नोव्हेंबर २०२७ पर्यंत प्रकल्प सेवेत दाखल करण्यात येणार असल्याचेही अधिकाऱ्यांनी सांगितले.

# पनवेलमधून १८ हजार जवानांसाठी दिवाळीचा फराळ

**पनवेल : वार्ताहर**

दिवाळीच्या सणात कुटुंबापासून दूर राहून देशाच्या सीमेचे रक्षण करणाऱ्या जवानांच्या चेहऱ्यावर आनंद फुलवण्यासाठी पनवेलकरांनी पुढाकार घेतला आहे. भारत विकास परिषद, पनवेल शाखेतर्फे यंदा तब्बल १८ हजार जवानांसाठी दिवाळीचा फराळ पाठवण्यात येणार आहे. या उपक्रमाचे हे सातवे वर्ष असून, फराळाचे बॉक्स तयार करण्यासाठी स्वयंसेवक आणि नागरिकांची लगबग सुरू आहे.

मागील वर्षी १६ हजार ५०० जवानांपर्यंत फराळ पोहोचवण्यात आला होता. यंदा या उपक्रमाचा विस्तार करून १८ हजार फराळाचे बॉक्स तयार केले जात आहेत. प्रत्येक बॉक्समध्ये चार ड्रायफ्रूट लाडू, चार चकल्या, १२५ ग्रॅम चिवडा आणि शंकरपाळी यांचा समावेश आहे. फराळ सुरक्षितपणे जवानांपर्यंत पोहोचावा, यासाठी प्रत्येकी २० बॉक्स एका मोठ्या मास्टर बॉक्समध्ये पॅक केले जात आहेत.या उपक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे फराळासोबत जवानांना हस्तलिखित शुभेच्छापत्रेही पाठवली जाणार आहेत. शाळकरी मुले, महिला आणि नागरिकांनी मराठी व हिंदी भाषेत जवानांसाठी शुभेच्छा संदेश लिहिले आहेत. काही पत्रांमध्ये कविता आणि भावनिक संदेशांचाही समावेश आहे. सीमेवर तैनात असलेल्या जवानांना दिवाळीच्या शुभेच्छांसोबत आपुलकीचा संदेश पोहोचवण्याचा यामागील उद्देश आहे.

अरुणाचल प्रदेशातील तवांग तसेच लेह, लडाख आणि सियाचीन येथील दुर्गम भागांत तैनात असलेल्या जवानांपर्यंत हा फराळ पोहोचवण्यात येणार आहे. अतिउंचीवरील आणि प्रतिकूल हवामानात कर्तव्य बजावणाऱ्या जवानांसाठी टिकाऊ फराळाचे पॅकिंग काळजीपूर्वक केले आहे.

पनवेलसह ठाणे, कल्याण आणि मुंबई येथील स्वयंसेवक या उपक्रमात सहभागी होत आहेत. दिवाळीच्या सुमारे चार आठवडे आधीच फराळ तयार करण्याचे आणि पॅकिंगचे काम सुरू केले जाते. शनिवार-रविवारी स्वयंसेवक सकाळी ९ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत एकत्र येऊन बॉक्स तयार करण्याचे काम करतात.

"सीमेवर देशाचे रक्षण करणाऱ्या जवानांप्रति सद्भावना व्यक्त करण्यासाठी हा उपक्रम राबवला जातो. फराळ मिळाल्यानंतर जवानांना होणारा आनंद ते छायाचित्रे, व्हिडिओ आणि पत्रांद्वारे आमच्यापर्यंत पोहोचवतात. त्यातून स्वयंसेवकांनाही पुढील वर्षी अधिक व्यापक स्वरूपात उपक्रम राबवण्याची प्रेरणा मिळते," असे भारत विकास परिषदेच्या कोकण, मुंबई व गोवा महिला विभागाच्या क्षेत्रीय अधिकारी डॉ. कीर्ती समुद्रा यांनी सांगितले.

# पनवेल महानगरपालिकेच्या वतीने कामोठ्यामध्ये महिलांसाठी विशेष आरोग्य शिबिराचे आयोजन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेच्या 'सेवा संकल्प अभियान २०२६' अंतर्गत महिला व बालकल्याण विभाग आणि वैद्यकीय आरोग्य विभागाच्या संयुक्त विद्यमाने लोकनेते प्रभाग क कामोठे अंतर्गत प्रभाग समिती कार्यालयात शुक्रवार( दि ९) ऑक्टोबर रोजी विशेष आरोग्य शिबिरांचे आयोजन करण्यात आले. या शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी बालकल्याण समितीच्या सभापती ममता प्रितम म्हात्रे, प्रभाग समिती सभापती क चे सभागपती रविंद्र जोशी , नगरसेवक डॉ अरुण कुमार भगत, नगरसेविका शीला भगत, सामाजिक कार्यकर्ती शुभांगी खरात उपस्थित होते.



यावेळी महिला व बालकल्याण समितीच्या सभापती ममता प्रितम म्हात्रे यांनी आरोग्य शिबीराविषयी माहिती दिली.तसेच सभापती रविंद्र जोशी यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. या शिबिरांमध्ये महिलांना विविध आरोग्यविषयक समस्यांवर मोफत तपासणी तसेच तज्ज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन मिळाले.या शिबिरांमध्ये सांधेदुखी, गुडघेदुखी, हात-पायांची सूज व मुंग्या येणे, नसांशी संबंधित त्रास तसेच मान, पाठ व कंबरदुखी अशा समस्यांवर मोफत तपासणी व तज्ज्ञ मार्गदर्शन मिळाले. तसेच उच्च रक्तदाब, मधुमेह, नेत्ररोग व दंतरोग तपासणी, स्तन, गर्भाशय मुख आणि मुख कर्करोग तपासणी, गरोदर महिलांसाठी प्रसूतीपूर्व तपासणी, लसीकरण सेवा, रक्त आणि हिमोग्लोबिन तपासणी, क्षयरोग (TB) तपासणी, मलेरिया, डेंग्यू, चिकनगुनिया आणि लेप्टोस्पायरोसिस तपासणी, सिकसेल आजार व रक्तक्षय (ॲनिमिया) तपासणी अशा विविध आरोग्य सेवा व तपासणी सेवा देण्यात आल्या. यावेळी सुमारे १३० लाभार्थ्यांनी लाभ घेतला.

यावेळी विशेष रक्तदान शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यात आले. होते. नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेणे आणि रक्ताचा तुटवडा भासू नये यासाठी या सामाजिक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात परिसरातील नागरिकांनी उस्फूर्तपणे सहभागी होऊन रक्तदान केले, तसेच तज्ज्ञ डॉक्टरांकडून आरोग्य तपासणीचा लाभ घेतला.

या आरोग्य तपासणी शिबिरास मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ आनंद गोसावी, डॉ उषा राठोड, डॉ. वैभवी निंबाळकर, उपस्थित होते.

## रक्तदान शिबिर आणि मोफत आरोग्य तपासणी

**नवीन पनवेल :** श्री प्रल्हादराय झुलेलाल ट्रस्ट, श्री पूज्य सिंधी पंचायत ट्रस्ट, पनवेल विद्यार्थी वाहक संस्था पनवेल, पनवेल-नवी मुंबई पत्रकार संघ, आम्ही रक्तदाते पनवेलचे, विश्व सिंधी सेवा संगम आणि पनवेल तालुका पत्रकार विकास मंच यांच्या सहकार्याने आयोजित बत्तीसावे रक्तदान शिबिर आणि मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन रविवार ११ ऑक्टोबर रोजी सकाळी नऊ ते तीन वाजेपर्यंत श्री पूज्य सिंधी पंचायत झुलेलाल मंदिर, विश्राळी नाका पनवेल येथे आयोजित करण्यात आले आहे. यावेळी अवयव दान या विषयावर मार्गदर्शन केले जाईल. यावेळी इसीजी आणि रक्त शर्करा तपासणी करण्यात येणार आहे. या रक्तदान शिबिरात रक्तदान करण्याचे आवाहन ॲड. मनोहर सचदेव यांनी केले आहे.



**पनवेल : आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत शुक्रवार, दिनांक ९ ऑक्टोबर रोजी मार्केट यार्ड येथे आयोजित कर्तव्यदक्ष बिल्डिंग प्रमुख व BLA-२ यांच्या सन्मान सोहळ्यास तसेच SIR प्रक्रियेसंदर्भातील बैठकीस BLA-१ म्हणून नगरसेवक परेश ठाकूर उपस्थित होते. यावेळी मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरीक्षण प्रक्रियेबाबत चर्चा करण्यात आली. मतदार यादीतील नोंदींची अचूकता, पात्र मतदारांची नावे यादीत समाविष्ट करणे आणि नागरिकांमध्ये आवश्यक जनजागृती निर्माण करणे यांसंदर्भात विचारविनिमय करण्यात आला. तसेच या प्रक्रियेत BLA-२ यांची भूमिका, जबाबदाऱ्या व समन्वय यावरही चर्चा झाली.**



**पनवेलः माजी सभागृह नेते तथा नगरसेवक परेश ठाकूर यांनी पनवेल महानगरपालिकेच्या माध्यमातून खारघर सेक्टर १२ येथे नियोजित असलेल्या खारघर मार्केटच्या जागेची पाहणी केली. यावेळी प्रस्तावित मार्केटच्या नियोजनासंदर्भात आढावा घेतला.यावेळी सोबत नगरसेवक प्रविण पाटील , वासुदेव पाटील व महापालिका कर्मचारी होते.**

## निवडक

### एक लाखाच्या साड्यांची चोरी

**नवीन पनवेल :** दुकानाच्या बाहेर ठेवलेल्या एक लाख ७ हजार रुपये किमतीच्या साड्यांची चोरी केल्याप्रकरणी अनोळखी इसमाविरोधात कळंबोली पोलीस ठाण्यात आठ ऑक्टोबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. जेठाराम चौधरी हे कळंबोली सेक्टर ४ इ येथे राहत असून सात ऑक्टोबर रोजी सायंकाळी साडेसातच्या सुमारास त्यांच्या पानेरी साडी, शॉप नंबर एक, गोकुळधाम सोसायटी, प्लॉट नंबर ७, सेक्टर चार कळंबोली येथील दुकानाच्या बाहेर ठेवलेल्या एक लाख ७ हजार रुपये किमतीच्या साड्यांची अनोळखी इसमाने चोरी केली. ही चोरीची घटना सीसीटीव्ही कॅमेरात कैद झाली आहे या प्रकाराची माहिती पोलिसांना दिल्यानंतर पोलीस घटनास्थळी दाखल झाले. आणि अनोळखी इसमाविरोधात गुन्हा दाखल केला.

### अत्याचार करून १५ लाखांची फसवणूक

**नवीन पनवेल :** महिलेवर बलात्कार करून तिच्याकडील १५ लाख रुपये घेऊन फसवणूक केल्या प्रकरणी सतीश बिपिन पाटील (राहणार उरण) याच्या विरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात आठ ऑक्टोबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. सतीश पाटील याने ऑगस्ट २०२५ ते ऑक्टोबर २०२६ दरम्यान पीडित फिर्यादीला लग्नाचे आमिष दाखवून करंजाडे, पुष्पक नगर या ठिकाणी नेऊन त्यांच्याशी शारीरिक संबंध प्रस्थापित केले आणि त्यांचे लैंगिक शोषण केले आणि वेगवेगळी खोटी कारणे सांगून १५ लाख रुपये घेऊन त्यांची फसवणूक केली. या प्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात तक्रार दिल्यानंतर आरोपी विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. या प्रकरणी पनवेल शहर पोलीस अधिक तपास करत आहेत.

### ३५ लाख ६६ हजारांची फसवणूक

**नवीन पनवेल :** ३५ लाख ६६ हजार रुपये घेऊन ती रक्कम परत न करता फसवणूक केल्या प्रकरणी कामोठे पोलीस ठाण्यात सात ऑक्टोबर रोजी चौघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. यातील फिर्यादी हर्षवर्धन रवींद्र सिंग हे कामोठे, सेक्टर २९ येथे राहत असून २९ जून २०२६ ते २७ सप्टेंबर दरम्यान आरोपी प्रतीक कुमार, निलेश देसाई, हिमांशू राठोड आणि कमलेश राहणार यांनी फिर्यादी यांच्या खात्यात आलेली रक्कम ३५ लाख ६६ हजार ही परत न करता त्यांना वेगवेगळ्या खात्यामध्ये ट्रान्सफर करून रकमेचा अपहार केला. या प्रकरणी पोलीस अधिक तपास करत आहेत.

# रिक्षात विसरलेली बॅग आणि मोबाईल पोलिसांच्या मदतीने परत

**पनवेल : वार्ताहर**

ऑटो रिक्षात विसरलेली बॅग आणि मोबाईल रिक्षाचालकाच्या प्रामाणिकपणामुळे पोलिसांच्या मदतीने मूळ मालकाला परत मिळाले. या घटनेतून प्रामाणिकपणा आणि सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडले.

स्पर्श हॉस्पिटलजवळ ऑटो रिक्षातून प्रवास करताना संतोष बंडू देशमुख यांची मोबाईल व कागदपत्रे असलेली बॅग रिक्षातच विसरली. बॅग हरवल्याचे लक्षात येताच त्यांनी पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली.



दरम्यान, एमएच ४६ बीडी ५२३७ क्रमांकाच्या रिक्षाचे मालक संतोष बाबुराव शेडगे यांना आपल्या रिक्षात प्रवाशाची विसरलेली बॅग आढळली. त्यांनी ती पोलिस ठाण्यात जमा केली.

पोलिसांनी देशमुख यांच्याशी संपर्क साधून त्यांना बोलावले. ओळख पटवून खात्री केल्यानंतर बॅग आणि त्यातील मोबाईल त्यांच्याकडे सुपूर्द करण्यात आले.रिक्षाचालक संतोष शेडगे यांनी दाखवलेल्या प्रामाणिकपणामुळे देशमुख यांना त्यांचा मौल्यवान ऐवज परत मिळाला.

# खारघर आरटीओ कार्यालयात ओळखपत्र तपासणीनंतरच प्रवेश

## नागरिकांच्या रांगा वाढल्याने संभ्रम

**पनवेल : वार्ताहर**

खारघर येथे सुरू असलेल्या पनवेल उपप्रादेशिक परिवहन कार्यालयात (आरटीओ) नागरिकांचे ओळखपत्र तपासूनच प्रवेश दिला जात असल्याचे समोर आले आहे. या नव्या व्यवस्थेमुळे कार्यालयात येणाऱ्या नागरिकांच्या रांगा लागत असून, प्रवेशाच्या नियमांबाबत संभ्रम निर्माण झाला आहे.

पनवेल आरटीओ कार्यालय काही महिन्यांपूर्वी खारघर येथे स्थलांतरित झाले. गेल्या काही दिवसांपासून कार्यालयाच्या प्रवेशद्वारावर नागरिकांची ओळखपत्रे तपासली जात आहेत. यासाठी एका व्यक्तीची नियुक्ती करण्यात आली असून, संबंधित नागरिकाचे आरटीओ कार्यालयात कोणते काम आहे, याचीही चौकशी केली जात आहे.

शासकीय कार्यालयात प्रवेशासाठी ओळखपत्र तपासणीची ही व्यवस्था कोणत्या नियमांनुसार लागू करण्यात आली आहे, असा प्रश्न उपस्थित होत आहे. दुसरीकडे, कार्यालयातील कामकाज अधिक सुव्यवस्थित व्हावे आणि अनावश्यक गर्दी टाळता यावी, या उद्देशाने ही व्यवस्था सुरू करण्यात आली असण्याची शक्यता आहे.

दरम्यान, काही महिन्यांपूर्वी आरटीओ कार्यालय परिसरात उभारण्यात आलेल्या पत्र्याच्या शेडवरून स्थानिक सोसायटी आणि आरटीओ अधिकाऱ्यांमध्ये वाद झाला होता. तसेच सप्टेंबरमध्ये विलास सनगर या एजंटला साडेचार हजार रुपयांची लाच घेताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने पकडल्याची घटनाही घडली होती.

पनवेलचे उपप्रादेशिक परिवहन अधिकारी जयंत चव्हाण यांनी सांगितले की, सध्या आरटीओ कार्यालयातील सुमारे ७० टक्के कामकाज ऑनलाइन झाले आहे. नागरिकांची कामे लवकर व्हावीत, यासाठी ऑनलाइन प्रणाली सुरू करण्यात आली आहे. ज्या व्यक्तीचे कार्यालयात काम आहे, त्या व्यक्तीनेच कार्यालयात यावे, असेही त्यांनी स्पष्ट केले.ओळखपत्र तपासणीच्या व्यवस्थेमुळे नागरिकांची गैरसोय होऊ नये, तसेच प्रवेशासंबंधीचे नियम स्पष्टपणे जाहीर करावेत, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

# उलवे येथे सीबीएसईची 'कौशल बोध' क्षमता विकास प्रशिक्षण कार्यशाळा

**उलवे : रामप्रहर वृत्त**

रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल, उलवे येथे केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाच्या (CBSE) वतीने इयत्ता सहावी ते आठवीसाठी 'कौशल बोध' पाठ्यपुस्तकांच्या माध्यमातून कौशल्य शिक्षणाच्या अनिवार्य अंमलबजावणीसंदर्भात क्षमता विकास प्रशिक्षण कार्यशाळेचे यशस्वी आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेत एकूण १९१ शिक्षकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

'कौशल बोध' हा विद्यार्थ्यांमध्ये व्यावहारिक कौशल्ये विकसित करण्यासाठी सुरू करण्यात आलेला शैक्षणिक उपक्रम आहे. या उपक्रमाचा मुख्य उद्देश पुस्तकी ज्ञान आणि प्रत्यक्ष जीवनातील अनुभव यांची सांगड घालणे हा आहे. विविध कृती, प्रकल्प आणि प्रत्यक्ष अनुभवांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये सर्जनशीलता, चिकित्सक विचार, समस्या सोडविण्याची क्षमता, सांघिक भावना आणि स्वावलंबन यांसारख्या महत्त्वपूर्ण जीवनकौशल्यांचा विकास करण्यावर भर दिला जातो.

कार्यक्रमाची सुरुवात पारंपरिक दीपप्रज्वलनाने झाली. त्यानंतर प्रमुख मार्गदर्शक पूनम ठाकूर, प्राचार्या,



पोदार इंटरनॅशनल स्कूल, मीरा रोड आणि झीनत सय्यद, प्राचार्या, पोदार इंटरनॅशनल स्कूल, अंबरनाथ यांचा परिचय करून देत सत्कार करण्यात आला. दोन्ही मार्गदर्शकांनी अत्यंत प्रभावी, संवादात्मक आणि कृतीशील पद्धतीने शिक्षकांना मार्गदर्शन केले. 'कौशल बोध' उपक्रमाची वर्गातील प्रभावी अंमलबजावणी, कृतीआधारित व प्रकल्पाधारित अध्यापनाचे महत्त्व तसेच विद्यार्थ्यांमध्ये आवश्यक जीवनकौशल्ये विकसित करण्याच्या विविध पद्धती यांविषयी सविस्तर माहिती दिली. विविध उपक्रम आणि प्रात्यक्षिकांमुळे कार्यशाळा अधिक रंजक व ज्ञानवर्धक ठरली.

# उरणचा हवा गुणवत्ता निर्देशांक शंभरी पार

**उरण : रामप्रहर वृत्त**

तालुक्यात मागील काही दिवसांपासून सकाळच्या वेळेत धुरक्याची चादर पसरत आहे. अशातच येथील हवा गुणवत्ता निर्देशांकात वाढ होऊन गुरुवारी हे प्रमाण १२० पर्यंत पोहचले होते. येथील मार्गांवरील खड्डे आणि वाहनांमुळे हवेत धूलिकण वाढल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे. दरम्यान हवेत दिवसणारे धुरके नसून धुके असल्याचा दावा महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे नवी मुंबई विभागीय अधिकारी विक्रांत भालेराव यांनी केला आहे.

## धुरक्यामध्ये वाढ

उरणकरांच्या मते हवेत प्रदूषणाची मात्रा वाढू लागली आहे. त्याचा त्रास येथील ज्येष्ठ नागरिक, आजारी व्यक्ती यांना सहन करावा लागत आहे. तालुक्यात अनेकांना सध्या श्वसनाचे आजरही जडू लागले आहेत. औद्योगिक परिसरात धुरक्याचे प्रमाण अधिक असल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे.

वातावरणात सध्या बदल होत आहेत. यामुळे उरण परिसरात धुके पसरले आहे. सध्या हवेत दिसणारे धुरके नाही. सूर्याच्या तापमानात हे धुके कमी होत असल्याचे नवी मुंबई महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे विभागीय अधिकारी विक्रांत भालेराव यांनी सांगीतले.

## संपादकीय

# उष्णतेचा तडाखा

बांधकाम स्थळांवरील धूळ नियंत्रण, रस्त्यांची नियमित स्वच्छता, कचरा जाळण्यास प्रतिबंध आणि अतिरिक्त प्रदूषण आढळणाऱ्या ठिकाणांवर विशेष देखरेख यांना प्राधान्य मिळायला हवे. प्रशासनाच्या प्रयत्नांना नागरिकांच्या सहभागाची जोड मिळाली तर त्याचे परिणाम अधिक प्रभावी ठरतील.

**महाराष्ट्रातून नैऋत्य मोसमी पावसाने निरोप घेताच राज्यातील काही भागांत उष्णतेचे आणि हवेच्या घसरत्या गुणवत्तेचे आव्हान उभे राहिले आहे. मुंबई, रायगड आणि कोकणातील काही भागांना उष्णतेच्या लाटेचा इशारा मिळाला आहे. बदलत्या हवामानाचे संकेत ओळखून प्रशासन आणि नागरिक या दोघांनीही वेळीच सावध होण्याची गरज आहे. विशेषतः ज्यांना वाढत्या तापमानामुळे डिहायड्रेशनचा त्रास होऊ शकतो किंवा किडनी अथवा श्वसनाचे विकार बळावू शकतात अशा लोकांनी या काळात विशेष दक्षता घेण्याची गरज आहे. तसे पाहिले तर ऑक्टोबरमधील उकाडा काही पहिल्यांदाच जाणवत नाही. गेल्या काही वर्षांत मुंबई व पश्चिम किनारपट्टी परिसरात पावसाळ्यानंतर तापमानात अचानक वाढ होण्याची प्रवृत्ती वारंवार दिसून आली आहे. मात्र ही परिस्थिती केवळ हंगामी बदल म्हणून दुर्लक्षित करता येणार नाही. पश्चिम किनारपट्टीवर ऑक्टोबर ते डिसेंबर या काळात उष्णता आणि आर्द्रतेमुळे निर्माण होणारा ताण वाढत आहे. वाढते जागतिक तापमान, समुद्राकडून येणाऱ्या वाऱ्यांना होणारा विलंब आणि शहरांमधील काँक्रीटीकरण यांचा एकत्रित परिणाम नागरिकांना अधिक तीव्रतेने जाणवू शकतो. त्यामुळे याकडे दीर्घकालीन हवामान अनुकूलन आणि शहरी नियोजनाच्या दृष्टीनेही गांभीर्याने पाहण्याची गरज आहे. मुंबईत गुरुवारी कमाल तापमानाने या वर्षातील उच्चांक गाठला. भारतीय हवामान विभागाने गुरुवारीच मुंबई आणि रायगड जिल्ह्याच्या काही भागांसाठी उष्णतेचा इशारा दिला, तर दक्षिण कोकणातील काही ठिकाणीही वाढत्या उष्णतेची शक्यता वर्तविण्यात आली. वाढत्या उष्णतेसोबतच मुंबईतील हवेच्या गुणवत्तेची घसरती पातळीही लक्ष वेधून घेत आहे. गुरुवारी मुंबईतील हवेचा गुणवत्ता निर्देशांक म्हणजेच एक्युआय मध्यम प्रदूषणाच्या श्रेणीत पोहोचला. पावसामुळे धुतले जाणारे धूलिकण आता हवेत टिकून राहण्याची शक्यता वाढली आहे. वाऱ्यांचा वेग कमी असताना वाहनांचा धूर, बांधकामातील धूळ आणि औद्योगिक उत्सर्जन यांचा एकत्रित परिणाम अधिक जाणवू शकतो. रायगड जिल्हा आणि कोकणातही औद्योगिक पट्टे, वाढते नागरीकरण, बांधकामे आणि वाहनांची वाढती वर्दळ यांमुळे वाढती उष्णता, दमटपणा अधिक जाणवतो आहे. या भागांतही जनतेने गरजेनुसार आवश्यक ती आरोग्यविषयक काळजी घेतली पाहिजे. स्थानिक परिस्थितीनुसार प्रदूषणाचे स्वरूप बदलत असल्याने नियमित निरीक्षण आणि माहिती नागरिकांपर्यंत पोहोचविणे आवश्यक आहे. मुंबई महापालिका, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि राज्य सरकारकडून प्रदूषण नियंत्रणासाठी सुरू असलेल्या उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी केली जाते आहे. दिवाळीच्या काळात फटाक्यांचा मर्यादित वापर आणि डिसेंबरमध्ये थंडीमुळे प्रदूषके जमिनीजवळ साचण्याची शक्यता लक्षात घेऊन आतापासूनच दक्षतेची तयारी करणे गरजेचे आहे. नागरिकांनी उष्णतेच्या काळात पुरेसे पाणी प्यावे, दुपारचे श्रम टाळावेत आणि हवेची गुणवत्ता खालावल्यास लहान मुले, ज्येष्ठ नागरिक व श्वसनविकार असलेल्या व्यक्तींनी विशेष काळजी घ्यावी. हवामानातील बदल कुणालाच एका दिवसात थांबविता येणार नाहीत. मात्र या बदलांचे परिणाम कमी करण्यासाठी वैज्ञानिक दृष्टिकोन, काटेकोर नियोजन आणि प्रशासनाची तत्परता महत्त्वाची आहे. उष्णता आणि प्रदूषणाच्या या दुहेरी आव्हानाचा सामना करण्यासाठी शासन आणि समाज यांनी एकत्रितपणे पावले उचलणे हीच काळाची गरज आहे.**

# दुष्काळाचे सावट : संवेदनशील शासनाचा भक्कम आधार



महाराष्ट्रावर दुष्काळाचे गंभीर संकट घोंघावत असताना शासनाने तातडीने आणि संवेदनशीलतेने निर्णय घेत शेतकऱ्यांसह सर्वसामान्यांना दिलासा देण्याचे काम केले असून केवळ घोषणा न करता प्रत्यक्ष अंमलबजावणीवर भर देण्यात आला आहे. नैसर्गिक आपत्तीच्या काळात शासनाची भूमिका केवळ मदत वाटपापुरती मर्यादित न ठेवता नागरिकांच्या जीवनात स्थैर्य निर्माण करण्याची असते, हाच दृष्टिकोन सध्याच्या निर्णयांमध्ये दिसून येत आहे. एल निनोचा अत्युच्च प्रभाव, हिंदी महासागरातील द्विध्रुव स्थिती आणि पावसासाठी आवश्यक कमी दाबाच्या क्षेत्राच्या अभावामुळे महाराष्ट्रावर दुष्काळाचे संकट निर्माण झाले आहे. राज्याचा बराचसा भाग हवामानातील टोकाचे चढ–उतार आणि निसर्गाची अवकृपा अनुभवत आहे. राज्याच्या ग्रामीण अर्थकारणाला चालना देणाऱ्या खरीप हंगामापुढे पर्जन्यमानातील मोठ्या तुटीने दुष्काळाचे आव्हान निर्माण केले आहे.

शेतातील उभी पिके एक तर करपली आहेत किंवा ती पार वाळून गेल्याचे चित्र अनेक भागांत निर्माण झाले आहे. काही ठिकाणी पिकांच्या उत्पादनात मोठी घट होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. जमिनीतील ओलावा कमी झाल्याने रब्बी हंगामावरही परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. पुरेसे जलसाठे निर्माण न झाल्याने पिण्याच्या पाण्याचा गंभीर प्रश्नही काही भागात आ वासून उभा आहे. दुष्काळाचे संकेत मिळत असतानाच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वतः मराठवाड्यासह काही दुष्काळी भागांना भेट दिली. प्रत्यक्ष बांधावर जाऊन त्यांनी दुष्काळाच्या संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांच्या व्यथा जाणून घेतल्या. या संकटाच्या काळात राज्य शासन प्रत्येक शेतकऱ्याच्या पाठीशी ठामपणे उभे आहे, असा विश्वास त्यांनी दिला. परिस्थितीवर अत्यंत गांभीर्याने लक्ष ठेवून असलेल्या राज्य शासनाने कुठल्याही आकडेमोडीच्या तांत्रिकतेत न अडकता आपली संवेदनशील निर्णयक्षमता दाखवत तडकाफडकी दिलासा देणारे निर्णय जाहीर केले.

या निर्णयांची अंमलबजावणीही सुरू झाली असून संपूर्ण प्रशासकीय यंत्रणा कामाला लागल्याचे चित्र सर्वदूर दिसत आहे.दुष्काळ व्यवस्थापन संहितेनुसार २६५ तालुक्यांमध्ये प्रथम कळ अंतर्गत अधिकृतपणे दुष्काळ जाहीर करण्यात आला आहे. आपत्तीच्या क्षणी सामान्य नागरिकाला भक्कम प्रशासकीय आधार मिळणे ही केवळ औपचारिकता नसून शासनाचे प्राथमिक कर्तव्य आहे, याच जाणिवेतून हा निर्णय घेण्यात आला. केवळ दुष्काळ जाहीर करून राज्य शासन थांबलेले नाही. सोबतच दुष्काळाने प्रभावित होणाऱ्या संभाव्य घटकांना दिलासा देणारा १२ कलमी आराखडाही राज्य शासनाने जाहीर केला आहे. या आराखड्यामुळे प्रशासनाला स्पष्ट दिशा मिळाली असून मदतकार्याला गती आली आहे. दुष्काळात शेतकरी हा सर्वात जास्त प्रभावित होणारा घटक ठरतो. संभाव्य आर्थिक विवंचनेत सापडणाऱ्या शेतकऱ्यांना तातडीने काय दिलासा देता येईल, याचा गांभीर्याने विचार करून राज्य शासनाने निर्णय घेतले असून त्या निर्णयांची काटेकोर अंमलबजावणी सुरूही झाली आहे.

एकीकडे पिकांच्या नुकसानीचे अंतिम स्वरूप स्पष्ट झाल्यानंतर स्वतंत्र निर्णयाद्वारे नुकसानभरपाईची आर्थिक मदत थेट शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्याची कार्यपद्धती निश्चित करण्यात आली असतानाच, दुसरीकडे तातडीचे धोरणात्मक निर्णय लागूही करण्यात आले आहेत.बाधित तालुक्यांतील शेतकऱ्यांचा संपूर्ण जमीन महसूल माफ करण्यात आला आहे. तसेच पीक कर्जाचे पुनर्गठन करण्याचे निर्देश देत शेतीशी निगडित सर्व प्रकारच्या कर्जवसुलीस स्थगिती देण्यात आली आहे. साडेसात अश्वशक्तीपर्यंतच्या कृषी पंपांचे वीजबिल आधीच माफ करण्यात आले असताना, आता त्यावरील क्षमतेच्या पंपांनाही चालू वीजबिलात विशेष सूट देण्यात आली आहे. शिवाय, वीजबिल थकबाकीमुळे कोणतीही शेती वीजजोडणी खंडित न करण्याचे सक्त आदेश देण्यात आले आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांना आगामी काळाची चिंता भेडसावणार नाही, याची पूर्ण काळजी राज्य शासनाकडून घेण्यात आली आहे.

विविध कारणांमुळे आर्थिक अडचणीत येणाऱ्या शेतकऱ्यांसाठी राज्य शासनाने काही महिन्यांपूर्वी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेची यशस्वीपणे अंमलबजावणी केली होती. त्याद्वारे शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात दिलासा मिळाला होता. आता दुष्काळाचे संकट उभे ठाकले असताना त्याच निर्धाराने शेतकऱ्यांना मदतीचा आधार देण्याची तयारी सुरू आहे. शासनाच्या या भूमिकेमुळे शेतकऱ्यांमध्ये मोठा विश्वास निर्माण झाला असून ते पुन्हा उभारी घेण्यासाठी सज्ज होत आहेत. दुष्काळामुळे केवळ शेती आणि पिकांचेच नुकसान होत नाही, तर ग्रामीण अर्थव्यवस्थेतील इतरही घटक अडचणीत येतात. या अडचणींचे स्वरूपही वेगवेगळे असते. ही बाब लक्षात घेऊन राज्य शासनाने आपल्या निर्णयांद्वारे सामाजिक सुरक्षिततेवरही भर दिला आहे. दुष्काळाची झळ विद्यार्थ्यांच्या भवितव्याला बसू नये, याची काळजी राज्य शासनाने घेतली आहे. शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क पूर्णपणे माफ करण्यात आले आहे.

यामुळे पालकांवरील आर्थिक भार काही प्रमाणात हलका होणार आहे. दुष्काळाच्या काळात ग्रामीण भागात रोजगाराच्या शोधात मोठ्या प्रमाणात स्थलांतराची परिस्थिती निर्माण होते. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून राज्य शासनाने ग्रामीण भागातील स्थलांतर रोखण्यासाठी रोजगार हमी योजनेच्या निकषांमध्ये शिथिलता आणून जास्तीत जास्त कामे सुरू करण्याचे पाऊल उचलले आहे. कुटुंबांना अन्नधान्याची टंचाई जाणवू नये, यासाठी पुरवठा यंत्रणा सज्ज करण्यात आली आहे. टंचाई जाहीर झालेल्या गावांमध्ये पिण्याच्या पाण्यासाठी तातडीने व्यवस्था उभ्या करण्यात आल्या आहेत. आवश्यक तिथे पाण्याचे टँकर्स उपलब्ध करण्यात येत आहेत.जनावरांच्या चाऱ्याची टंचाई भासू नये, यासाठी चारा डेपो व छावण्यांचे पूर्वतयारी नियोजन आणि जलसंधारणाची कामे युद्धपातळीवर हाती घेण्यात आली आहेत. पिण्याच्या पाण्याचे संकट काही प्रमाणात शहरी भागातही निर्माण होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्या पार्श्वभूमीवर उपलब्ध जलस्रोतांचा काटेकोर वापर, वापराचे प्राधान्यक्रम तसेच मर्यादित पाणी कपातीसारखे निर्णयही स्थानिक पातळीवर घेण्यात येत आहेत.

भविष्यात पिण्याच्या पाण्याचे गंभीर संकट निर्माण होऊ नये, यासाठी ही खबरदारी घेतली जात आहे.हे संकट अधिक गडद होऊ नये, यासाठी पाण्याचा मर्यादित व काटेकोर वापर करण्याबाबत जनजागृतीही करण्यात येत आहे. आपत्ती निवारण ही केवळ एक तांत्रिक प्रक्रिया नसून त्यामागे मानवी दृष्टिकोन आणि सामाजिक बांधिलकी असणे अत्यावश्यक असते. राज्य शासनाने दाखवलेली संवेदनशीलता याचाच प्रत्यय देणारी आहे. प्रशासकीय यंत्रणा, लोकप्रतिनिधी आणि नागरिक यांच्या समन्वयातूनच या संकटावर मात करणे शक्य होणार आहे. शासनाने जाहीर केलेल्या उपाययोजना या केवळ तात्पुरत्या स्वरूपाच्या नसून दीर्घकालीन उपाययोजनांच्या दिशेने टाकलेले महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे.

शेतीला शाश्वत आधार देणे, जलसंधारण बळकट करणे आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला स्थैर्य देणे या उद्देशाने या निर्णयांकडे पाहिले जात आहे. राज्यातील दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने घेतलेले हे गतिमान निर्णय ग्रामीण जनतेला केवळ आर्थिक दिलासा देणारे नसून या कठीण काळात शासन आपल्या पाठीशी खंबीरपणे उभे असल्याचा ठाम विश्वास निर्माण करणारे आहेत. या विश्वासाच्या बळावर संकटावर मात करण्यासाठी समाजातील प्रत्येक घटकानेदेखील आपला खारीचा वाटा उचलण्याची गरज आहे.

**–संचालक (माहिती) कार्यालय, नागपूर**



## बदलते तंत्रज्ञान

# सायबर क्रिमिनल्सकडून बँकेच्या पर्सनल लोनद्वारे लूट

डिजिटल अरेस्टच्या माध्यमातून लोकांना लाखो रुपयांचा गंडा घातला जात आहे. सायबर क्रिमिनल्स हे लोकांच्या नावावर बँकेतून पर्सनल लोन घेतात. त्यानंतर ते पैसे मिळताच त्यावर डल्ला मारतात आणि कोट्यवधी रुपयांची फसवणूक करतात.



बँक खात्यात पैसे नसले तरी तुमची लाखोंची लूट होऊ शकते. सध्या याचं प्रमाण वाढलं आहे. डिजिटल अरेस्ट स्कॅम काय आहे ते जाणून घेऊया... डिजिटल अरेस्ट स्कॅममध्ये, एखाद्या व्यक्तीला एका अनोळखी नंबरवरून कॉल येतो.

कॉलवर सांगितलं जातं की, तुमच्या नावाने एक पार्सल परदेशात जात होतं, ज्यामध्ये ड्रग्ज सापडले आहेत किंवा तुमच्या मोबाईलचा, बँक अकाऊंटचा वापर हा मनी लॉन्ड्रिंग प्रकरणात केला गेला आहे. मात्र हा फोन आपल्याला जाळ्यात अडकवण्यासाठी असतो.

बनावट पोलीस यानंतर सीबीआय किंवा अन्य सरकारी यंत्रणांचं नाव वापरून फेक अरेस्ट वॉरंटही दाखवतात. यानंतर घरामध्ये कॅमेऱ्यासमोर राहण्याच्या सूचना देण्यात येतात. यालाच डिजिटल अरेस्ट असं म्हणतात. सायबर ठग डिजिटल अटक करून तुमच्या बँक खात्याचे तपशील आणि इतर माहिती मिळवतात. यानंतर, ते तुमच्या नावावर सहजपणे पर्सनल लोन घेऊ शकतात, ज्याची रक्कम तुमच्या बँक खात्यात येते आणि नंतर ते तुमच्या बँक खात्यातून पैसे काढू शकतात.

डिजिटल अरेस्टदरम्यान, पोलीस, सीबीआय किंवा इतर कायदेशीर एजन्सी तुम्हाला स्काईप किंवा व्हॉट्सपवर व्हिडीओ कॉलवर येण्यास सांगू शकतात. या काळात, ते तुम्हाला तुमची मोबाइल स्क्रीन शेअर करण्यास देखील सांगू शकतात, त्यानंतर ते तुमच्या मोबाइलवर होणारी प्रत्येक एक्टिव्हिटी सहजपणे पाहू शकतात. स्क्रीन शेअरिंग दरम्यान, जर तुम्हाला बँकेकडून ओटीपी मिळत असेल, तर स्क्रीन शेअरिंगमुळे ते तुमच्या ओटीपी एक्सेस करू शकतात. तुमच्या बँक खात्यात जास्त रक्कम नसेल तर ते तुमच्या नावावर पर्सनल लोन घेऊ शकतात.

नेहमी लक्षात ठेवा की तुमचा OTP, बँक डिटेल्स आणि पर्सनल माहिती कोणत्याही अनोळखी व्यक्तीसोबत कधीही शेअर करू नका. सायबर क्रिमिनल्स इंटरनेट बँकिंगद्वारे तुमच्या बँक खात्यात लॉग इन करू शकतात. त्यानंतर तेथून लाखो रुपयांचे व्यवहार होऊ शकतात.

# जागतिक मानसिक आरोग्य दिन

दरवर्षी १० ऑक्टोबर हा जागतिक मानसिक आरोग्य दिन म्हणून साजरा केला जातो. हा दिवस मानसिक आरोग्यासंबंधित समस्यांबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी आणि मानसिक आरोग्य जपण्यासाठी जागतिक पातळीवर साजरा केला जातो. मानसिक आरोग्याचे महत्त्व पटवून देणे, मानसिक आरोग्याबाबत लोकांना शिक्षित आणि जागरूक करणे आणि त्यासाठी आवश्यक धोरणांना समर्थन करणे हे हा दिवस साजरा करण्यामागचे उदिष्ट आहे.

जागतिक मानसिक आरोग्य दिन १० ऑक्टोबर १९९२ रोजी १५०हून अधिक देशांमध्ये सक्रिय असलेल्या जागतिक मानसिक आरोग्य संघटनेच्या प्रयत्नांमुळे १० ऑक्टोबर १९९२ रोजी सुरू झाला. वर्ल्ड फेडरेशन फॉर मेंटल हेल्थचे डेप्युटी सेक्रेटरी जनरल रिचर्ड हंटर यांनी १९९२मध्ये हा उपक्रम प्रस्तावित केला होता. विविध माध्यमांवर मानसिक आरोग्याच्या समस्यांबाबत जागरूकता निर्माण करणे, मानसिक आरोग्याच्या समस्या असणे म्हणजे कोणताही कलंक नाही हे पटवून देणे आणि मानसिक आरोग्य कसे जपावे याबाबत चर्चा करण्यासाठी प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न या दिवशी केले जाता. एखाद्या व्यक्तीला किंवा एखाद्या समाजाला, मानसिक आरोग्य आणि त्याचा लोकांच्या आयुष्यावर होणारा परिणाम



## निमित्त

आणि मदतीसाठी उपलब्ध साधनांबाबत शिक्षित करणे हे यामागील ध्येय आहे

मानसिक आरोग्यासंबंधित अडचणी दूर करणे, मानसिक आरोग्याबाबत जागरूक आणि संवेदनशील समाज निर्माण करणे आणि मानसिक आरोग्याच्या समस्यांकडे आवश्यक लक्ष आणि महत्त्व दिले जावे हे जागतिक मानसिक आरोग्य दिनाचे उद्दिष्ट आहे. आपण सामना करीत असलेल्या मानसिक आरोग्याच्या समस्यांबाबत जास्तीत जास्त संवाद साधणे हादेखील हा दिवस साजरा करण्याचा एक मार्ग आहे. मानसिक आरोग्याच्या अनेक समस्यांपैकी एक म्हणजे नैराश्य. नैराश्य हा एक मानसिक आरोग्याचा आजार आहे, ज्यामध्ये एखाद्या व्यक्तीला सातत्याने दुःखी असल्याची भावना जाणवते. आपली कोणालाही गरज नाही असे वाटते, जगण्यासाठी किंवा कोणतेही काम करण्यासाठी उत्साह वाटत नाही आणि आनंद मिळेल अशा गोष्टी करण्यात रस नाही असे वाटते. त्यामुळे एखाद्या व्यक्तीला रोजच्या जीवनातील सामान्य गोष्टी करण्यासाठी अडथळा येऊ शकतो आणि विविध प्रकारची शारीरिक आणि मानसिक लक्षणे दिसू शकतात.

यापैकी काही लक्षणे जाणवत असल्यास नैराश्य असेल असे नाही हे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे. कारण प्रत्येकाच्या आयुष्यात चांगले–वाईट दिवस येत असतात, पण जर ही लक्षणे दोन आठवडे किंवा त्यापेक्षा जास्त काळ सातत्याने जाणवत असतील. तुमच्या दैनंदिन कार्यावर परिणाम होत असेल तर डॉक्टरांची मदत घेण्याचा सल्ला दिला जातो.

१९९४ च्या सुरुवातीच्या वर्षांमध्ये हा दिवस विशिष्ट थीमशिवाय साजरा केला गेला. प्रामुख्याने सामान्य मानसिक आरोग्य समस्यांबद्दल लोकांना शिक्षित करण्यावर लक्ष केंद्रित केले. १९९४मध्ये जागतिक फेडरेशन फॉर मेंटल हेल्थचे तत्कालीन सरचिटणीस यूजीन ब्रॉडी यांच्या मार्गदर्शनाखाली हा दिवस थीम असलेल्या उत्सवात बदलला. तुम्ही ज्यांच्याजवळ आहात त्यांना हे कळू द्या की, तुम्ही त्यांच्या मानसिक आरोग्याला प्राधान्य देता. (साभार इंटरनेट)

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# रिकाम्या पोटी चहा पिण्याचे दुष्परिणाम

भारतात दिवसाची सुरुवात चहाशिवाय अपूर्ण मानली जाते. सकाळी उठताच हातात चहाचा कप घेऊन राहणे अनेकांना आवडते. पण तुम्ही कधी विचार केला आहे का की सकाळी रिकाम्या पोटी चहा पिल्याने तुमच्या आरोग्यावर काय परिणाम होतो? त्यामुळे पोटातील आम्ल वाढते का? सकाळचा चहा तुमचा मूड ताजा करू शकतो, परंतु जर तो रिकाम्या पोटी प्यायला गेला तर तो हळूहळू तुमच्या पचनसंस्थेला हानी पोहोचवू शकतो. म्हणून, जर तुम्हाला चहाची आवड असेल तर तो योग्य वेळी आणि योग्य पद्धतीने पिणे चांगले आहे जेणेकरून तुमच्या आरोग्यावर परिणाम न होता त्याचा आनंद घेता येईल.



**१. कोणत्या समस्या उद्भवू शकतात? :** जेव्हा तुम्ही झोपेतून उठता तेव्हा तुम्ही एक प्रकारे उपवास करत असता कारण तुमचे पोट रिकामे असते. यावेळी, पोटात असलेले जठरासंबंधी रस म्हणजेच आम्ल आधीच सक्रिय असते. जर तुम्ही यावेळी चहा (विशेषतः दुधाची चहा) प्यायली तर ते पोटाचे आम्लीय स्वरूप आणखी वाढवू शकते. यामुळे तुम्हाला ॲसिडिटी, छातीत जळजळ, गॅस आणि पोटफुगी यासारख्या समस्या उद्भवू शकतात.

**२. समस्या उद्भवण्याची कारणे? :** चहामध्ये असलेले कॅफिन आणि टॅनिन देखील पचनक्रियेला बिघडू शकते. टॅनिन हे एक संयुग आहे जे पचनक्रिया मंदावते आणि भूक कमी करू शकते. म्हणून, रिकाम्या पोटी चहा पिल्याने पोटाच्या नैसर्गिक आवरणाला नुकसान होऊ शकते, ज्यामुळे नंतर पोटाच्या समस्या होण्याची शक्यता वाढते.

**३. लक्षणे :** सकाळी चहा पिल्यानंतर पोटात जडपणा जाणवणे. घशात आंबट ढेकर येणे किंवा जळजळ होणे. भूक न लागणे किंवा अन्नाचा तिटकारा येणे. दुपारपर्यंत पोटात गॅस होणे आणि फुगणे. जर ही लक्षणे वारंवार जाणवत असतील, तर ते तुमच्या सकाळच्या चहाची सवय तुमच्या पोटासाठी चांगली नसल्याचे लक्षण असू शकते.

**४. आम्लपित्त कसे टाळावे? :** चहा पिण्यापूर्वी भिजवलेले बदाम, केळी किंवा कोरडे टोस्ट असे काहीतरी हलके खा. कमी कॅफिन असलेले हर्बल टी किंवा ग्रीन टी सारखे पर्याय निवडा. सकाळी सर्वात आधी कोमट पाणी किंवा लिंबू पाणी पिल्याने पोट शांत होते.

# दिवाळीपूर्वी तळा शहर उजळणार

## पथदिवे लावण्याचे काम प्रगतिपथावर; नागरिकांतून समाधान व्यक्त

**तळा : प्रतिनिधी**

तळा शहरात अनेक विभागात पथदिवे लावण्याचे काम सुरू असून दिवाळीपूर्वी तळा शहर प्रकाशमय होणार आहे. तळा शहरात यापूर्वीही अनेक ठिकाणी पथदिवे व सौर दिवे लावले आहेत. त्यामध्ये इंडियन ऑइल कॉर्पोरेशन लिमिटेडच्या (आयओसीएल) सीएसआर निधीतून तळा नगरपंचायत क्षेत्रात १८० सौर पथदिवे यांचे लोकार्पण नुकतेच खासदार सुनील तटकरे यांच्या हस्ते झाले असून हा भाग प्रकाशमय झाला आहे.



आता इंदापूर ते मांदाड रस्त्यावरील तळा शहरातील इंजिनीअरिंग कॉलेज ते चंडिका माता नाक्यापर्यंत, चंडिकादेवी नाका ते चंडिका देवी मंदिर, साईनगरपर्यंत अशा प्रकारे नगरपंचायतीच्या माध्यमातून पथदिवे लावण्यात येत आहेत, तर काही ठिकाणी लावले आहेत. हे दिवे दिवाळीपूर्वी सुरू होणार असल्याने नागरिकांतून समाधान व्यक्त केले जात आहे.हे पथदिवे तळा–मांदाड रस्त्यावर तळा नगरपंचायत क्षेत्रात टाकत असल्याने या मार्गावर वयोवृद्धांपासून ते तरुणवर्ग नियमित मॉर्निंग वॉकसाठी सकाळी–संध्याकाळी जात असतो. आता हा मार्ग प्रकाशमय होणार असल्याने एक आधार झाला आहे.

काही खेळाडू या मार्गावर सकाळी धावण्याचा सराव करत असतात. हा भाग ग्रामीण असल्याने येथे रस्त्याच्या कडेला झाडे–झुडपे असल्याने साप अथवा विंचूसारखे उपद्रवी प्राणी रस्त्यावर येत असतात. पथदिवे चालू होत असल्याने त्यापासून एक प्रकारे धोका टाळता येईल.तसेच या इंजिनीअरिंग कॉलेजमध्ये जाणाऱ्या व येणाऱ्या विद्यार्थ्यांनाही याचा फायदा होणार आहे. याचबरोबर नगरपंचायतीने आसावरी हॉटेल ते तहसील कार्यालयापर्यंत असे पथदिवे टाकण्यात यावेत, अशी मागणीही जोर धरत आहे.

दरम्यान, तळा तालुक्याची मुख्य कार्यालये तहसील कार्यालय, पंचायत समिती कार्यालय, कोषागार कार्यालय व औद्योगिक प्रशिक्षण संस्था ही या भागात असल्याने आसावरी हॉटेल नाका ते तहसील कार्यालयादरम्यानच्या रस्त्यावर कर्मचारी वर्ग, विद्यार्थी, ग्रामस्थ, नागरिक तसेच मॉर्निंग वॉकसाठी जाणारे नागरिक यांची रेलचेल या रस्त्यावर रात्रीपर्यंत असतेच. त्याचबरोबर आपत्कालीन व्यवस्थापन कक्षही तहसील कार्यालयात असल्याने पावसाळ्यात अनेक वेळा या मार्गाचा कर्मचारी व नागरिकांना वापर करावा लागत असल्याने नगरपंचायतीने याकडे लक्ष घालून या मार्गावर पथदिवे लावावेत, अशी मागणी होताना पहावयास मिळत आहे.

# निजामपूरच्या अरुंद रस्त्यामुळे वाहतूक कोंडीची समस्या

**माणगाव : प्रतिनिधी**

आंतरराष्ट्रीय माणगाव, निजामपूर ते पुणे जिल्ह्यातील आदरवाडीपर्यंत जाणारा महत्त्वाचा मार्ग आजही अरुंद रस्त्याच्या कोंडीत अडकला आहे. माणगावपासून निजामपूरपर्यंत सुमारे १० किलोमीटर, निजामपूर ते पुढे ताम्हिणी घाटाच्या दिशेने सुमारे ३५ किलोमीटरचा मार्ग अनेक ठिकाणी अरुंद आहे. रस्त्याच्या दुतर्फा वाढलेली झुडपे, खचलेल्या साइडपट्ट्या आणि अपुऱ्या रुंदीमुळे वाहनचालकांसह स्थानिक नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.



विशेषतः निजामपूर बाजारपेठेतील अरुंद रस्ता वाहतुकीसाठी मोठी डोकेदुखी ठरत आहे. त्यामुळे चौऱ्याऐंशी गावखोऱ्यांची बाजारपेठ असलेल्या निजामपूरचा श्वासच कोंडला आहे. पर्यटन उद्योगामुळे कोकणच्या विकासाला नवे बळ मिळेल या दृष्टिकोनातून या रस्त्याची निर्मिती झाली, मात्र कोकणच्या विकासाची वाट चार दशकांनंतरही अरुंदच राहिली आहे. ताम्हिणी मार्गावर औद्योगिक–पर्यटन वाहतुकीचा वाढता ताण लक्षात घेता रुंदीकरण महत्त्वाचे आहे, तसेच या मार्गासह निजामपूर शहराला बायपासची गरज असून यासाठी पुणे व रायगड जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींचा समन्वय महत्त्वाचा आहे.

आंतरराष्ट्रीय माणगाव–पुणे अरुंद रस्त्याचा प्रश्न मार्गी लागून विकासाची कोंडी सुटेल, असा विश्वास नागरिकांना वाटत आहे. निजामपूर केवळ गाव नसून परिसरातील ८४ गावखोऱ्यांसाठी प्रमुख बाजारपेठ व शैक्षणिक केंद्र आहे. बाजारपेठ, भाजीपाला खरेदी–विक्री, शाळा, महाविद्यालये, आयटीआय, मराठी व इंग्रजी माध्यमाचे शिक्षण, उच्च माध्यमिक विद्यालय, जवाहर नवोदय विद्यालय, महसूल सजा, मंडळ अधिकारी कार्यालय व पोलीस दूरक्षेत्र यामुळे मोठ्या संख्येने नागरिकांची ये–जा सुरू असते. बाजारपेठेतील अरुंद रस्त्यावर पादचारी, दुचाकी, चारचाकी, मालवाहू वाहने आणि औद्योगिक वाहतूक यांचा एकत्रित ताण निर्माण होतो. यातच विळे, भागाड औद्योगिक परिसरातील वाढती वाहतूक ही समस्या अधिक गंभीर करीत आहे. औद्योगिक क्षेत्रातील वाहनांची ये–जा, स्थानिक बाजारपेठेतील गर्दी आणि पुणे, कोकण मार्गावरील पर्यटकांची वाढती संख्या यामुळे निजामपूर परिसरात वाहतूक कोंडीचे प्रसंग वारंवार निर्माण होत आहेत.


**भरती - सुरक्षा रक्षक**

पगार : रु. 25,000 – रु. 28,000

**ड्युटी :** 12 तास

**वय :** 21 ते 50 वर्षे

**शैक्षणिक पात्रता**
किमान 10 वी पास

**पद :** सिक्युरीटी गार्ड

**पीएफ/ईएसआयसी/बोनस**

**आठवड्याला 1 दिवस सुट्टी**

**लोकेशन :** अजिवली गाव, पळस्पा फाट्याजवळ पनवेल.

**: संपर्क :**
8082592990
8082592995


# मध्य रेल्वेची धडक कारवाई

## फुकट्या प्रवाशांकडून १५९ कोटींचा दंड वसूल

**रोहा : प्रतिनिधी**

सुरक्षित, सुलभ व सन्मानजनक प्रवासाची खात्री करण्याच्या कटिबद्धतेनुसार मध्य रेल्वेने आपल्या संपूर्ण नेटवर्कवर अनधिकृत व विनातिकीट प्रवासाविरुद्धची कारवाई अधिक तीव्र केली आहे. किमान दंडाच्या रकमेत झालेली वाढ व तिकीट तपासणीच्या तीव्र मोहिमांमुळे आर्थिक वर्ष २०२६–२७ मध्ये (सप्टेंबर २०२६ पर्यंत) महत्त्वपूर्ण परिणाम दिसून आले आहेत. एप्रिल ते सप्टेंबर २०२६ कालावधीत मध्य रेल्वेच्या तिकीट तपासणी पथकांनी विनातिकीट प्रवास करणाऱ्या २०.४७ लाख प्रवाशांना पकडले आहे. त्यांच्याकडून १५९.३४ कोटी रुपयांचा विक्रमी दंड वसूल केला आहे.

गेल्या वर्षी याच कालावधीत २०.०५ लाख प्रकरणांमधून ११६.४६ कोटी रुपयांचा दंड वसूल करण्यात आला. त्या तुलनेत ही आकडेवारी अधिक असून उत्पन्नात ३७ टक्क्यांपेक्षा जास्त वाढ झाल्याचे दिसून आले. दंड वसुली व प्रकरणांची संख्या पाहता एप्रिल ते सप्टेंबर २०२६ कालावधीतील विभागनिहाय कामगिरी अशी – मुंबई १०.११ लाख प्रकरणांतून ६६.९२ कोटी रुपये, भुसावळ विभाग ३.७७ लाख प्रकरणांतून ३८.९० कोटी रुपये, पुणे विभाग २.१३ लाख प्रकरणांतून १८.६८ कोटी रुपये, नागपूर विभाग २.३६ लाख प्रकरणांतून १७.९३ कोटी रुपये आदी आकडेवारी आहे.

# गारमाळ जंगलात बेपत्ता तरुणाचा शोध सुरूच

**खोपोली : प्रतिनिधी**

मूळचा नागपूरचा असलेला आणि पुण्यात बहुराष्ट्रीय कंपनीत (एमएनसी) कार्यरत असलेला राहुल सुमित मिश्रा हा खोपोली येथील गगनगिरी आश्रमात फिरण्यासाठी आला होता. ३ ऑक्टोबर रोजी पहाटेच्या सुमारास तो गारमाळच्या जंगलातील मिसिंग लिंक पॉइंट परिसरातून अचानक बेपत्ता झाला. घटनेची माहिती मिळताच खोपोली पोलिसांसह लोणावळ्याची शिवदुर्ग मित्र मंडळ टीम, हेल्प फाउंडेशन व डेला ॲडव्हेंचरच्या रेस्क्यू टीमने शोधमोहीम हाती घेतली.

बचाव पथकातील सदस्यांनी ५०० ते ६०० फूट खोल दरीत उतरून राहुलचा शोध घेण्यास सुरुवात केली आहे. जंगलाच्या परिसरात ड्रोन कॅमेऱ्यांचा वापर करूनही व्यापक शोध घेण्यात आला. घटनास्थळी राहुलची दुचाकी (टीव्हीएस), हेल्मेट, मोबाईल फोन, बॅग आणि चप्पल सापडली आहे. घटनास्थळाची परिस्थिती पाहता दुचाकीचा अपघात झाल्याची शक्यता वर्तवली जात आहे.

# नागाव बीचवर स्वच्छतागृह सुविधा




**रेवदंडा : प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्यातील नागाव समुद्रकिनारी येणाऱ्या पर्यटकांना स्वच्छ, सुरक्षित आणि दर्जेदार सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र पर्यटन विभागाच्या माध्यमातून आधुनिक फॅब्रिकेटेड शौचालय व बाथरूम सुविधा उभारण्यात आली आहे. महिला व पुरुषांसाठी स्वतंत्र प्रत्येकी चार सीटची व्यवस्था असलेल्या या सुविधेचे उद्घाटन जिल्हा परिषद अध्यक्ष मंगेश वाकडीकर यांच्या हस्ते करण्यात आले.

या सुविधेमुळे नागावच्या पर्यटन विकासाला नवी चालना मिळणार आहे.नागाव समुद्रकिनारी पर्यटकांची वाढती संख्या लक्षात घेऊन मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी सरपंच हर्षदा निखिल मयेकर यांनी सातत्याने पाठपुरावा केला होता. त्यांच्या प्रयत्नांतून आणि पुढाकारातून ही सुविधा उपलब्ध झाली आहे. समुद्रकिनाऱ्याची स्वच्छता, सौंदर्य आणि पर्यटनाच्या दृष्टीने आवश्यक पायाभूत सुविधांचा विकास करण्यासाठी ग्रामपंचायतीकडून प्रयत्न सुरू आहेत.

उद्घाटनप्रसंगी जिल्हा परिषद सदस्य सचिन राऊळ, माजी सरपंच नंदकुमार मयेकर, माजी सरपंच तथा विद्यमान सदस्य निखिल मयेकर, उपसरपंच मंगला नागे, ग्रामपंचायत सदस्य प्रियांका काटे, निकिता पाडेकर, वीणा पिंपळे यांच्यासह ग्रामस्थ आणि ग्रामपंचायत कर्मचारी उपस्थित होते. यावेळी जिल्हा परिषद अध्यक्ष मंगेश वाकडीकर यांनी नागावच्या पर्यटन विकासासाठी कॉर्पोरेट सामाजिक उत्तरदायित्व (सीएसआर) निधीतून आर्थिक मदत देण्याचे आश्वासन दिले. नागाव समुद्रकिनाऱ्यावर पर्यटकांसाठी आवश्यक पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी सहकार्य करण्याची भूमिका त्यांनी व्यक्त केली.

जि. प. सदस्य सचिन राऊळ यांचेही नागावच्या पर्यटन विकासासाठी सहकार्य व पाठबळ लाभत आहे. सरपंच हर्षदा निखिल मयेकर म्हणाल्या, नागाव समुद्रकिनारी येणाऱ्या पर्यटकांची संख्या सातत्याने वाढत आहे. त्यामुळे पर्यटकांना स्वच्छ, सुरक्षित आणि दर्जेदार सुविधा उपलब्ध करून देणे ही आमची प्राथमिकता आहे. नव्याने उपलब्ध शौचालय व बाथरूम सुविधा पर्यटन विकासाच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल आहे. महाराष्ट्र पर्यटन विभाग, जिल्हा परिषद, लोकप्रतिनिधी आणि ग्रामपंचायतीच्या समन्वयातून भविष्यातही नागावमध्ये अधिकाधिक पर्यटन सुविधा निर्माण करण्यासाठी प्रयत्नशील राहू.

नागाव समुद्रकिनारा अधिक स्वच्छ, सुंदर आणि पर्यटकाभिमुख बनविण्याच्या दृष्टीने ही सुविधा महत्त्वपूर्ण ठरणार आहे. आगामी काळात सीएसआर निधीच्या माध्यमातून आणखी विकासकामे मार्गी लागल्यास नागावच्या पर्यटनाला अधिक बळ मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

# रायगडात तीन खाड्यांतील रेती उत्खननाला परवानगी

## सात लाख ब्रास साठा खुला

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील कुंडलिका नदी, सावित्री नदी आणि धरमतर खाडीतील रेती उत्खननास मेरीटाईम बोर्डाने परवानगी दिली आहे. यामुळे रेती व्यावसायिकांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. रायगड जिल्ह्यातील धरमतर खाडी, कुंडलिका नदी आणि सावित्री नदीत रेती उत्खनन केले जाते. नौकानयन मार्ग सुकर व्हावा आणि खाड्यांमधील गाळाचा निचरा व्हावा हा यामागचा मूळ उद्देश असतो. मेरीटाईम बोर्डाने यंदा तीनही खाडीपात्रातील १२ गट आणि ४७ उपगटांमध्ये रेती उत्खनन करण्यास परवानगी दिली आहे. या गटांमध्ये सुमारे सात लाख पाच हजार ब्रास रेतीसाठा उपलब्ध आहे.

सावित्री खाडीतील दोन गटांतील रेती उत्खननावर गेली काही वर्षे निर्बंध होते. त्यामुळे या परिसरातील रेती उत्खनन ठप्प होते. मात्र आता हे निर्बंध हटल्याने या परिसरातील मोठा रेतीसाठा उत्खननासाठी खुला होणार आहे. खनिकर्म विभागाने या १२ गट आणि ४७ उपगटांतील रेती लिलाव प्रक्रियेसाठी प्रशासकीय तयारी सुरू केली आहे. जिल्हाधिकारी कार्यालयात या संदर्भात नुकतेच बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या लिलावपूर्व बैठकीला रायगड आणि रत्नागिरी जिल्ह्यातील रेती व्यावसायिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. रेती व्यावसायिकांच्या विविध समस्या त्यांनी यावेळी प्रशासनासमोर मांडल्या.

खाडीतील रेती उत्खननासोबत समुद्रमार्गे रेती वाहतुकीला परवानगी द्या, अशी मागणी यावेळी व्यावसायिकांकडून करण्यात आली.


**पनवेल महानगरपालिका, पनवेल**
तालुका – पनवेल, जिल्हा – रायगड ४१०२०६

**जाहिर सुचना**
**विद्युत विभाग**

मा. आयुक्त, पनवेल महानगरपालिका यांच्या वतीने विद्युत विभागातील खालील कामाचे अंदाजपत्रक बनविण्याकरीता संबंधीत Manufacturer/Dealer/Contractor कडून वेगवेगळ्या बाबींचे दर मागविण्यात येत आहे.

**कामाचे नाव –** पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्र. १ येथील पिसार्वे तलाव सुशोभीकरणासाठी विद्युत रोषणाई व विद्युत विषयक कामे करणे.

सदरची माहिती www.panvelcorporation.com या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात आली आहे.

जा.क्र./पमपा/जनसंपर्क/३१२६/
प्र.क्र. ३३०/३५१/२०२६
दिनांक– ०९/१०/२०२६

**सही/–**
**राजेश कर्डिले**
शहर अभियंता
पनवेल महानगरपालिका



**हरकत नोटीस**

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे **अशिल श्री. प्रमोद शंकर मुंबईकर, रा. पनवेल, जि. रायगड** यांनी खालील नमूद मिळकती संदर्भात सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांसोबत खरेदी विक्री करारनामा केलेला असून सदर मिळकती संदर्भात मोबदला रक्कम देखील सदर मिळकतीच्या विद्यमान मालकास साक्षीदारां समक्ष अदा केलेली आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे –

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नंबर | क्षेत्र (हे. आर) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| धामणी, ता. पनवेल | २९/१ ब | जिरायत ०.९८.३० पो.ख. ०.३२.२० | १.५६ |
| | | एकूण १.३०.५० | |

सदर वर वर्णनांकीतं मिळकती संदर्भात आमचे अशिल **श्री. प्रमोद शंकर मुंबईकर** यांनी सदर मिळकतीच्या विद्यमान मालक व सातबारा सदरी असलेल्या चाहू हिरु भस्मा, गोमा हिरु भस्मा, बाळू चांगू उर्फ चांग्या भस्मा, आंबी काळूराम वाघ, मंगळी रामा उर्फ सुकटया निरगुडा, पुजा शिमग्या उर्फ धर्मा खंडवी, मनीबाई उर्फ सुकरी चांगू भस्मा या हिस्सेदारांसोबत सदर मिळकत खरेदी करण्याबाबत साठेकरार व तत्सम करारनामे केलेले आहेत. तसेच सदर मिळकत आमचे अशिलांचे बिनशर्त ताबेकब्जामध्ये दिलेली' आहेत. परिणामी सदर मिळकत आमचे अशिलांच्या विना तक्रार ताब्यामध्ये आहे. तसेच वर नमूद मिळकतीचा खरेदी विक्रीचा मोबदला रक्कम आमचे अशिलांनी सदर मिळकतीच्या विद्यमान मालक व सातबारा सदरी असलेल्या सह हिस्सेदारांना 'साक्षीदारांसमक्ष सदर व्यवहाराची संपूर्णपणे अदा केलेली आहे. असे असताना आमच्या अशिलांशी असलेला वर नमूद मिळकतीच्या संदर्भातला करारनामा 'डावलून अथवा भंग करुन सदर मिळकत परस्पर त्रयस्थ इसमांना विक्री करणार असल्याचे व त्याबाबतचा विक्रीचा करारनामा आमच्या अशिलांच्या अपरोक्ष करण्याचा प्रयत्न सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांकडून करण्यात येत असल्याचे आमच्या अशिलांच्या निदर्शनास आले आहे, सदर जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, संदर मिळकतीबाबत कोणताही कसल्याही प्रकारचा व्यवहार करु नये. अन्यथा आमचे अशिल सदर प्रकरणी दिवाणी फौजदारी कारवाई करतील. या उपरही सदर मिळकतीबाबत कोणत्याही प्रकारचे खरेदीखत, बक्षिसपत्र, साठेकरार, वचन चिठ्ठी, सामंजस्य करार केल्यास त्यास आमचे अशिलांची सक्त कायदेशीर हरकत असून असा कोणताही व्यवहार आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

अलिबाग,
दिनांक : ०९/१०/२०२६

**सही/–**
**ॲड. विक्रांत वि. पाटील**
म्हात्रोळी, अलिबाग रायगड
मो.नं. ८३२९४६१५४० / ९४०३६५१४३६ / ८८०५३२८६४६


# माणगावच्या फळबागांना विमाकवच

**माणगाव : प्रतिनिधी**

हवामानातील अनिश्चितता, अवकाळी पाऊस, तापमानातील चढ–उतार आणि बदलत्या नैसर्गिक परिस्थितीचा फटका फळबागांना बसत असताना शेतकऱ्यांना आर्थिक संरक्षण मिळावे, या उद्देशाने पुनर्रचित हवामान आधारित फळ पीक विमा योजना आंबिया बहार २०२६–२७ अंतर्गत राबविण्यात येत आहे. संत्रा, मोसंबी, काजू, डाळिंब, आंबा, केळी, द्राक्ष, स्ट्रॉबेरी, पपई, अंजीर, नारळ व सुपारी या फळपिकांचा योजनेत समावेश करण्यात आला आहे.

राज्यातील अधिसूचित क्षेत्रांमध्ये हवामान धोक्यांच्या निकषांनुसार ही योजना लागू करण्यात आली असून, पात्र शेतकऱ्यांनी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करून विहित मुदतीत विमा योजनेत सहभागी व्हावे, असे आवाहन माणगाव तालुका कृषी अधिकारी किरण पडवळकर यांनी केले आहे. शेतीचे अर्थकारण मोठ्या प्रमाणावर हवामानावर अवलंबून असते. विशेषतः फळबागांच्या लागवडीपासून उत्पादन मिळेपर्यंत शेतकऱ्यांना मोठा खर्च करावा लागतो. अशा परिस्थितीत प्रतिकूल हवामानामुळे उत्पादनावर परिणाम झाल्यास आर्थिक नुकसान सहन करावे लागते. त्यामुळे हवामान आधारित फळ पीक विमा योजना शेतकऱ्यांसाठी महत्त्वाची ठरू शकते. मात्र, योजनेचा लाभ मिळविण्यासाठी केवळ विमा अर्ज करणे पुरेसे नसून अधिसूचित पीक, उत्पादनक्षम फळबाग, आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करणे आवश्यक आहे.

या योजनेत कोकण विभागातील शेतकऱ्यांसाठी एका फळपिकाखालील किमान उत्पादनक्षम क्षेत्राची मर्यादा १० गुंठे ठेवण्यात आली आहे. उर्वरित विभागांसाठी ही मर्यादा २० गुंठे आहे. सर्व फळपिके व दोन्ही बहार मिळून एका शेतकऱ्याला जास्तीत जास्त चार हेक्टर क्षेत्रापर्यंत विमा संरक्षणाची मर्यादा लागू राहील. या योजनेत केवळ उत्पादनक्षम फळबागांनाच विमा संरक्षण मिळणार आहे. निर्धारित वयापेक्षा कमी वयाच्या फळबागांची विमा नोंदणी झाल्याचे पडताळणीत आढळल्यास विमा संरक्षण रद्द होऊ शकते. त्यामुळे शेतकऱ्यांनी फळबागेचे वय, क्षेत्र, पीक नोंद व इतर पात्रता निकष तपासूनच विमा प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे. विमा योजनेत सहभागी होण्यासाठी ॲग्रीस्टॅक नोंदणी, आधार कार्ड, बँक खात्याचा तपशील, सातबारा उतारा, जिओ–टॅग केलेला फोटो, ई–पीक पाहणी आणि डीसीएस यांसह आवश्यक नोंदी व कागदपत्रांची पूर्तता करणे बंधनकारक असल्याचे कृषी विभागाने स्पष्ट केले आहे.


**जाहीर नोटीस**

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की आमचे अशिलानी मौजे–केवाळे, ता. पनवेल, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेली मिळकत कायम स्वरुपी खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**जमिनीचे वर्णन**
**मौजे – केवाळे, ता. पनवेल, जि. रायगड**

| मौजे | जमिन भोगवटादाराचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे. आर.पॉ.) | आकार |
|---|---|---|---|---|---|
| केवाळे | नथु दुकल्या पालकर | ८ | १/अ | ०–४०–६० | ७.७२ |
| | | | | एकूण–०–४०–६० | |

**वरील जमिन मिळकती पैकी नथु दुकल्या पालकर यांच्या हिश्यातील ०–२०–६० गुंठे जमिन बाबत जाहीर नोटीस**

तरी वरील मिळकतीच्या बाबतीत अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, गहाण, दान, बक्षिस, साठेकरार, वचनपत्र, कुळ, वहिवाट, लिज, अन्नवस्त्र, पोटगी, इजमेंट, वारसाहक्क, हुकूमनामा वगैरे असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून **७** दिवसांच्या आत आपली लेखी हरकत प्रथमदर्शनी पुराव्यासहीत खालील सही करणार यांचेकडे रजि. पोस्टाने अथवा समक्ष दाखल करावी. वरील मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास वरील मिळकती या निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून सदरचे मिळकतीचे खरेदीचा व्यवहार पूर्ण केला जाईल व उशीरा येणा–या हरकती आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत हयाची नोंद घ्यावी.

ता. ०९/१०/२०२६
पनवेल

**सही/–**
**ॲड. प्रधान मधूकर पाटील**
१३५, नगरपालिका कॉम्प्लेक्स, ता.पनवेल, जि.रायगड
मोबाईल. ९३२४३७५५०२

# विकासकांकडून होणारा अनधिकृत पाण्याचा उपसा थांबवा

## नवी मुंबईच्या पाणी प्रश्नावर आमदार मंदा म्हात्रे यांनी दिले निवेदन

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई शहरातील वाढती पाणीटंचाई, नागरिकांना कमी दाबाने होणारा पाणीपुरवठा, विकासकांकडून होणारा कथित अनधिकृत पाणीउपसा तसेच एमआयडीसी परिसरातील पाण्याचा गैरवापर या गंभीर प्रश्नांवर आमदार मंदा म्हात्रे यांनी महापालिका प्रशासनाचे लक्ष वेधत तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली.



शहरातील सर्वसामान्य नागरिक, गावठाणे, झोपडपट्टी परिसर तसेच विविध सोसायट्यांमधील रहिवाशांना पाणीटंचाईचा सामना करावा लागत असताना दुसरीकडे मोठ्या बांधकाम प्रकल्पांकडून पाण्याचा अनधिकृत वापर होत असल्याच्या तक्रारी समोर येत आहेत. त्यामुळे उपलब्ध पाण्याचे योग्य नियोजन करून प्रत्येक नागरिकाला समान आणि पुरेशा दाबाने पाणी मिळावे, यासाठी आमदार मंदा म्हात्रे यांनी प्रशासनाकडे ठोस कार्यवाहीची मागणी केली.या मागणीची महापालिका प्रशासनाने तातडीने दखल घेत डॉ.कैलास शिंदे यांनी तातडीने पाणी प्रश्नावर बैठक आयोजित केली आहे . बैठकीत नवी मुंबईतील पाणीपुरवठ्याचे योग्य नियोजन करून नागरिकांना दिलासा देण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्यात येतील, असे प्रशासनाकडून सांगण्यात आले.

बैठकीमध्ये मुख्य जलवाहिन्यांवर हाय-प्रेशर मोटारी लावून अनधिकृतपणे पाणी उपसा करणाऱ्या विकासकांवर कारवाई, पाणीपुरवठ्यातील अनियमितता, एमआयडीसी परिसरातील पाण्याचा गैरवापर, पाणीचोरीच्या तक्रारी तसेच शहरातील विविध भागांमध्ये समान दाबाने पाणीपुरवठा करण्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.तसेच, कृत्रिम पाणीटंचाई निर्माण करून नागरिकांची आर्थिक पिळवणूक होऊ नये यासाठी टँकरच्या माध्यमातून होणाऱ्या पाणीपुरवठ्यावरही आवश्यक नियंत्रण ठेवण्याची मागणी आमदार मंदाताई म्हात्रे यांनी केली.

नवी मुंबईतील सर्वसामान्य नागरिकांना पाण्यासाठी वणवण करण्याची वेळ येता कामा नये. नागरिकांच्या हक्काच्या पाण्याचा अनधिकृत वापर किंवा गैरवापर कोणत्याही परिस्थितीत होऊ नये. उपलब्ध पाण्याचे योग्य नियोजन करून प्रत्येक भागातील नागरिकांना पुरेशा दाबाने आणि नियमित पाणी मिळणे आवश्यक आहे,अशी स्पष्ट भूमिका आमदार मंदाताई म्हात्रे यांनी मांडली.

महापालिका प्रशासनाने या प्रश्नावर तातडीने नियोजन करून आवश्यक त्या उपाययोजना करण्याचे आश्वासन दिले असून, पाणीपुरवठ्याशी संबंधित तक्रारींची दखल घेऊन आवश्यक तपासणी व कार्यवाही करण्यात येईल, असे यावेळी सांगण्यात आले.

या बैठकीस आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्यासह ,अतिरिक्त आयुक्त शिरीष अरद्वाड, कार्यकारी अभियंता मदन वाघचौरे, समाज विकास विभागाचे उपायुक्त कांबळे यांच्यासह महापालिकेचे अधिकारी, पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

नवी मुंबईतील पाणीप्रश्न केवळ पाणीपुरवठ्यापुरता मर्यादित नसून तो नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी निगडित अत्यंत महत्त्वाचा प्रश्न आहे. त्यामुळे नागरिकांना नियमित आणि पुरेसा पाणीपुरवठा मिळेपर्यंत प्रशासनाने प्रभावी नियोजन व आवश्यक कारवाई करावी, अशी मागणी आमदार मंदा म्हात्रे यांनी केली आहे.

नागरिकांच्या हक्काच्या पाण्यासाठी प्रशासनाने संवेदनशीलपणे काम करावे. पाणीचोरी अथवा गैरवापर करणाऱ्यांवर कारवाई झालीच पाहिजे आणि सामान्य नागरिकांना पुरेसे पाणी मिळाले पाहिजे अशी भूमिका आमदार मंदा म्हात्रे यांनी यावेळी व्यक्त केली.



## रेड रिबन क्लबच्या वतीने इंदिरा गांधी हॉस्पिटल येथे क्षेत्रभेट

**उरण : रामप्रहर वृत्त**

कोकण ज्ञानपीठ उरण विणिज्य व कला महाविद्यालयातील, राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने रेड रिबन क्लब आयोजित इंदिरा गांधी ग्रामीण हॉस्पिटल उरण या ठिकाणी एचआयव्ही अवेअरनेस व सरकारी आरोग्य व्यवस्थापन याविषयी क्षेत्रभेट आयोजित करण्यात आली.

प्राचार्य डॉ.वाल्मीक व्ही गर्जे यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झालेल्या या क्षेत्रभेटीमध्ये एचआयव्ही समुपदेशक महादेव पवार यांनी एचआयव्हीची लक्षणे, घ्यावयाची काळजी व वाढत्या HIV पॉझिटिव्ह रुग्णांचे वाढते प्रमाण याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. डॉ. अंकिता कदम यांनी टीबी लक्षणे व उपाय याविषयी मार्गदर्शन केले. डॉ. निलेश झावरे (आरोग्य निरीक्षक) यांनी यावेळी मार्गदर्शन केले. तर डॉ. विशाल पाटील यांनी रक्त तपासणी विषयी मार्गदर्शन केले. तृप्ती परजणे यावेळी उपस्थित होत्या.

विद्यार्थ्यांमध्ये एचआयव्ही अवेअरनेस निर्माण व्हावे व आरोग्यविषयक सकारात्मक जाणीव निर्माण होणाच्या उद्देशाने कार्यक्रमाचे आयोजन केले गेले. कार्यक्रमाचे नियोजन व व्यवस्थापन राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. दत्ता हिंगमिरे यांनी केले.

## सीकेपी सोशल क्लबतर्फे ज्येष्ठांचा सहस्रचंद्रदर्शनपूर्ती सोहळा

**नवी मुंबई : बातमीदार**

दरवर्षीच्या परंपरेनुसार 'दीपावली आनंदाची, सीकेपी ज्ञातीची' या संकल्पनेअंतर्गत सीकेपी सोशल क्लब, ठाणे यांच्या वतीने दिवाळी भेटीचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. शनिवार, ७ नोव्हेंबर रोजी सकाळी १० ते दुपारी १ या वेळेत ठाण्यातील क्लबच्या तिसऱ्या मजल्यावरील सीकेपी हॉलमध्ये हा कार्यक्रम होणार आहे.

या कार्यक्रमात सीकेपी ज्ञातीतील ज्येष्ठ सभासदांचा आणि वैवाहिक जीवनातील महत्त्वाचे टप्पे पूर्ण केलेल्या दाम्पत्यांचा विशेष सत्कार करण्यात येणार आहे. १ जानेवारी ते ३१ डिसेंबर २०२६ या कालावधीत वयाची ७५ वर्षे पूर्ण करणाऱ्या ज्येष्ठ सभासदांचा, तसेच वयाची ८२ वर्षे पूर्ण करून सहस्रचंद्रदर्शनाचा टप्पा गाठणाऱ्या सभासदांचा सन्मान केला जाणार आहे. याच कालावधीत विवाहाची ५० वर्षे पूर्ण करणाऱ्या दाम्पत्यांचाही सत्कार करण्यात येणार आहे.

या सत्कार सोहळ्यासाठी पात्र सभासदांनी आपली नावे ३१ ऑक्टोबर २०२६ पर्यंत सीकेपी सोशल क्लब, ठाणे यांच्या अधिकृत ७५०६१ १५७११ या क्रमांकावर नोंदवावीत, असे आवाहन करण्यात आले आहे.नावनोंदणीसाठी संबंधित व्यक्ती क्लबची सभासद असणे आणि कार्यक्रमाला स्वतः उपस्थित राहणे आवश्यक आहे. कार्यक्रमाच्या दिवशी ऐनवेळी नावनोंदणी स्वीकारली जाणार नाही. तसेच सभासदांसोबत येणाऱ्या व्यक्तींनाही वर्गणी देणे बंधनकारक असल्याचे क्लबतर्फे स्पष्ट करण्यात आले आहे.

दिवाळीच्या आनंदासोबत ज्ञातीतील ज्येष्ठांचा सन्मान, कौटुंबिक नात्यांचा गौरव आणि समाजातील स्नेहबंध अधिक दृढ करण्याच्या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. सीकेपी सोशल क्लबच्या सचिव ज्योती टिपणीस, सहसचिव कमलेश पालकर आणि संपूर्ण कार्यकारिणीच्या वतीने सभासदांना या कार्यक्रमात सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## नेरूळमध्ये बेलापूर किल्ल्याच्या इतिहासाचे व्याख्यान

**नवी मुंबई : प्रतिनिधी**



नवी मुंबईतील नेरूळ ,सेक्टर १२ येथील ' जेष्ठ नागरिक भवन ' मधील सभागृहात इतिहास आणि ग्रामसंस्कृती अभ्यासक ' गज आनन म्हात्रे ' यांचे बेलापूर किल्ल्याचा इतिहास या विषयावर व्याख्यान गुरूवारी पार पडले. यात म्हात्रे यांनी १५ व्या शतकापासून ते १९ व्या शतकापर्यंत ४०० वर्षांचा इतिहास उलगडून दाखवला.

चारशे वर्षात सिद्दी, पोर्तुगीज, मराठे, इंग्रज अशा चार सत्ता, किल्ल्याची चार वेळा नामांतरे, तीन युध्दे ,दोन वाटाघाटी, गोवर्धनी देवीचा विध्वंस आणि पुनर्वसन, कस्टम कार्यालय, बेलापूर गावात पेशव्यांनी बांधलेले शिवमंदिर, तलाव, पिंपळाचा अष्टकोनी दगडी पार ,किल्ला सत्तेतील ३३ गावे, पनवेल खाडीचा भूगोल अशी दुर्मिळ माहिती म्हात्रे यांनी दिली. या प्रसंगी सभागृहात १०० हून अधिक जेष्ठ नागरिक आणि जेष्ठ साहित्यिके मान्यवर उपस्थित होते.

## रेवा दिघेची आंतरराष्ट्रीय भरारी

### लिटल मिस इंडिया ऑफ द ईयर २०२६ किताबावर मोहोर

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

पळस्पे मॅरेथॉन नेक्स्ट झोन येथील दहा वर्षीय रेवा रोहिदास दिघे हिने ग्लोबल मॉडेल इंडिया-अल्फा जेन झी २०२६ स्पर्धेत 'जीएमआय लिटील मिस इंडिया ऑफ २०२६' हा मानाचा किताब पटकावला आहे. या यशानंतर बाली येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय स्पर्धेत भारताचे प्रतिनिधित्व करण्यासाठी तिची निवड झाली आहे.

पुणे येथील सिम्बायोसिस ऑडिटोरियममध्ये झालेल्या या स्पर्धेत भारतासह विविध देशांतील बालकलाकार व मॉडेल्स सहभागी झाले होते. महाराष्ट्रातून त्रिशा सोनावणे आणि रेवा दिघे, तर ओडिशातून अनन्या मेहर या तीन बालप्रतिभांची भारताचे प्रतिनिधित्व करण्यासाठी निवड झाली आहे. रेवा ही एमएनआर इंटरनॅशनल स्कूल पळस्पेची विद्यार्थिनी असून बालकलाकार आणि मॉडेल म्हणून कार्यरत आहे. तिने यापूर्वी विविध मॉडेलिंग शोमध्ये विजेतेपद मिळवले असून टीव्ही, आणि अभिनय क्षेत्रातही काम केले आहे. तिला बेस्ट वर्ल्ड रेकॉर्ड चाइल्ड मॉडेल अवॉर्ड बॉलीवूडमधील महिमा चौधरी यांच्याकडून देण्यात आला आहे. तिच्या या यशामागे शो डायरेक्टर अमर सोनावणे यांचे मार्गदर्शन तसेच आई-वडील रोहिदास सयाजी दिघे आणि तिची आई भाग्यश्री रोहिदास दिघे यांचा मोलाचा पाठिंबा आहे. आता बाली येथे भारताचे प्रतिनिधित्व करेल.



## कळंबोली एमजीएममध्ये मोफत हाडांचे विकार निदान शिबिर

**कळंबोली : बातमीदार**

पनवेल परिसरामधील ज्या रुग्णांना हाडांचे विकार किंवा संधिवाताने जर त्रस्त असतील तर त्यांच्यासाठी मोफत हाडांचे विकार निदान बाबतचे मोफत शिबिर कळंबोलीतील एमजीएम हॉस्पिटलमध्ये सोमवार दिनांक १२ ऑक्टोबर रोजी आयोजित करण्यात आले आहे. या शिबिराचा लाभ पनवेल तालुक्यातील जास्तीत जास्त हाडांच्या बाबतीत त्रस्त असलेल्या रुग्णांनी लाभ घेण्याचे आवाहन एमजीएमच्या प्रशासनाने केले आहे.

जागतिक संधिवात दिनानिमित्त कळंबोलीतील सेक्टर ४ई येथील हॉस्पिटलमध्ये संधिवातासारख्या व हाडांच्या दुर्धर आजाराने बेजार झालेल्या रुग्णांसाठी एक दिलासादायक शिबिराचे आयोजन एमजीएम हॉस्पिटल प्रशासनाने आयोजित केले आहे. यामध्ये हाडांचे विकार व त्याचे योग्य निदान याबाबतच्या शिबिरामधून रुग्णांचे हाडाच्या बाबतीतले निष्कर्ष योग्य तपासण्या करून केले जाणार आहेत. यामध्ये सांधेदुखी, पाठीच्या आजार, फॅक्चर,संधिवात, कंबर दुखी, मणक्याचे आजार, गुडघेदुखी,खांदा दुखी,लहान मुलांच्या हाडांच्या आजार याबाबतची मोफत तपासणी, केस पेपर,बीएमडी तपासणी करण्यात येणार आहे.

सोमवार दिनांक १२ ऑक्टोबर रोजी सकाळी नऊ ते दुपारी दोन या वेळेमध्ये जे हाडांच्या विकाराने त्रस्त आहेत त्यांनी कळंबोलीतील एमजीएम हॉस्पिटलमध्ये येऊन या शिबिराचा लाभ घेण्याच्या आवाहन हॉस्पिटल प्रशासनाने केले आहे. तसेच ज्या रुग्णावरती उपचार करण्याची आवश्यकता भासणार आहे. त्यांना आयुष्यमान भारत तसेच प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेमार्फत मोफत उपचारही केले जाणार आहेत.तरी गरजू रुग्णांनी कळंबोलीतील हॉस्पिटल प्रशासनामधील ९३२१७७०००९ व ८१०४४२५०१५ भ्रमणध्वनी क्रमांकावर संपर्क साधून आपली नोंदणी करण्याचे आवाहनही करण्यात आले आहे.

## महापौर सुजाता पाटील यांनी केली धुरीकरण मोहिमेची पाहणी

**नवी मुंबई : बातमीदार**

सेवा संकल्प अभियानाअंतर्गत दि. ०७ ते १३ ऑक्टोबर या कालावधीमध्ये नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रात विशेष धुरीकरण मोहिम राबविण्यात येत आहे. या मोहीमेंतर्गत होणा-या कामाची पाहणी आज महापौर सुजाता पाटील यांनी नेरूळ परिसरात केली. यावेळी त्यांच्यासमवेत ब प्रभाग समिती अध्यक्ष रूपाली भगत उपस्थित होत्या.

महापालिका आयुक्त डॉ कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली, वैद्यकिय आरोग्य अधिकारी डॉ. राजेश म्हात्रे व सहाय्यक आरोग्य अधिकारी डॉ. रत्नप्रभा चव्हाण यांच्या नियोजनानुसार सदर मोहिमेचे पर्यवेक्षण ना.प्रा.आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी व आरोग्य सहाय्यक यांचेमार्फत पर्यवेक्षण करण्यात येत आहे.

आज दिनांक ०८ ऑक्टोबर रोजी दुसऱ्या गटातील नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र, सेक्टर-४८, कुकशेत, खैरणे, सानपाडा, दिघा येथे रासायनिक धुरीकरण करण्यात आले. यामध्ये नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र कुकशेत कार्यक्षेत्रात महापौर सुजाता पाटील यांनी प्रभाग समिती अध्यक्ष रुपाली भगत यांचेसह धुरीकरण मोहीमेच्या अंमलबजावणीची पाहणी केली.

## वन्यजीव सप्ताह २०२६ निमित्त चार ठिकाणी जनजागृती कार्यक्रम

**उरण : रामप्रहर वृत्त**

नेचर फ्रेन्ड सोसायटी (NFS) पनवेल, वनपरिक्षेत्र पनवेल आणि वनपरिक्षेत्र पेण यांच्या संयुक्त विद्यमाने, वन्यजीव सप्ताह २०२६ निमित्त जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. वन परिमंडळ वाजेपूर, वन परिमंडळ पोयंजे, परिमंडळ आपटा व अग्निशामक दल पाताळगंगा यांच्या सहकार्याने हे कार्यक्रम संपन्न झाले.

दरवर्षी १ ते ७ ऑक्टोबर या कालावधीत संपूर्ण भारतात वन्यजीव सप्ताह साजरा केला जातो. १९५५ साली पहिल्यांदा वन्यजीव मंडळाने या सप्ताहाची सुरुवात केली. वन्यजीवांचे आणि निसर्गाचे संवर्धन, संरक्षण याबाबत जनजागृती करणे, मानव-वन्यजीव संघर्ष कमी करणे हा या सप्ताहामागचा मुख्य उद्देश आहे. याच पार्श्वभूमीवर पनवेल आणि पेण वनपरिक्षेत्रात हे जनजागृती सत्र घेण्यात आले.

या अंतर्गत दिनांक ५ ऑक्टोबर २०२६ रोजी नेरे हायस्कूल, नेरे येथे, दिनांक ६ ऑक्टोबर २०२६ रोजी जनता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यामंदिर, अजिवली व अग्निशामक दल पाताळगंगा-रसायनी येथे, तर दिनांक ७ ऑक्टोबर २०२६ रोजी रा. जि. प. प्राथमिक शाळा गुलसुंदे, कातकरीवाडी (फलाटवाडी) येथे कार्यक्रम घेण्यात आले.

या कार्यक्रमात विद्यार्थी, ग्रामस्थ महिला तसेच अग्निशामक दलातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना *वन्यजीवांचे महत्त्व, सस्तन प्राणी जनरल नॉलेज, सर्प व सर्पदंश जनजागृती आणि दिवाळीत फटाके वाजविल्याने वन्यजीवांवर होणारे दुष्परिणाम* या विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले.याप्रसंगी NFS पनवेल संस्थेचे संस्थापक/अध्यक्ष श्री. संतोष उदरे, संस्थेचे सदस्य तुषार कांबळे, कु. आर्यन उदरे, वन परिमंडळ पोयंजे अधिकारी समीर जाधव यांनी मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमास आपटा परिमंडळ अधिकारी अरुण घाडगे, वनरक्षक साहिल थोरात, . श्रीराम पोतदार, वाजेपूर परिमंडळाचे वनरक्षक गजानन देगलूरे, सतीश डोईफोडे, प्रतीक्षा कराडे, आबासाहेब मोरे,. प्रकाश मुंडे उपस्थित होते.

## खारघरमध्ये रंगणार 'नमो गरबा २०२६'चा भव्य उत्सव

### श्रावणी महाजन यांच्या सादरीकरणाचे आकर्षण




**खारघर : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पार्टी प्रणित मधु पाटील प्रतिष्ठान आणि प्रविण पाटील वेल्फेअर असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने खारघरमध्ये 'खारघरची आई नमो गरबा २०२६' या भव्य नवरात्रोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. ११ ते १९ ऑक्टोबरदरम्यान JHBC ग्राउंड, डी-मार्टसमोर, खारघर मेट्रो स्टेशनजवळ हा उत्सव रंगणार आहे.

उत्सवाचे विशेष आकर्षण म्हणजे 'संगीत सम्राट' आणि 'मी होणार सुपरस्टार' फेम श्रावणी महाजन यांचे सादरीकरण आणि लाईव्ह बँड. तसेच, ९ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ६ वाजता भव्य आगमन सोहळा होणार असून, एकविरा म्युझिकल ग्रुप मी बेलापूरकर आणि श्री दैवत ढोल-ताशा व ध्वजपथक सादरीकरण करणार आहेत.

पहिल्याच वर्षी भव्य स्वरूपात आयोजित या उत्सवातून भक्ती, परंपरा आणि गरब्याचा आनंद नागरिकांना अनुभवता येणार आहे. खारघर व नवी मुंबईतील नागरिकांनी कुटुंबीयांसह सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. कार्यक्रमाची तिकिटे BookMyShow वर उपलब्ध आहेत.

या उत्सवाचे आयोजन पनवेलचे माजी स्थायी समिती सभापती व नगरसेवक प्रवीण पाटील आणि प्रभाग समिती 'ब'चे सभापती व नगरसेवक मधु पाटील यांच्या पुढाकाराने करण्यात आले आहे.

## तुर्भे येथे झाडांची विनाअनुमती छाटणी

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

तुर्भे - वाशी लिंक मार्गावर रातोरात विनाअनुमती झाडांची छाटणी करण्यात आल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी नवी मुंबई महानगरपालिकेच्या तुर्भे येथील उद्यान सहाय्यक यांनी अद्याप कोणतीही कारवाई केली नसल्याचे उघड झाले आहे.

तुर्भे - वाशी लिंक मार्गावर कांदा-बटाटा बाजाराला लागून महापालिकेचे पदपथ आहे. या पदपथावर ठिकठिकाणी झाडे लावण्यात आलेली आहेत. यातील काही झाडांची सातोरात छाटणी करण्यात आली आहे. ही घटना घडून एक आठवडा झाला आहे, तरी देखील उद्यान विभागाकडून याची कोणतीही दखल घेण्यात आली नाही. तसेच एपीएमसी सिग्नल जवळ फळ बाजारात देखील काही झाडांची छाटणी करण्यात आली आहे.

झाडांची छाटणी होत असताना बाजारपेठे मधील सुरक्षारक्षकांना कळू नये, याविषयी आश्चर्य व्यक्त केले जात आहे. त्यामुळे या प्रकरणी एपीएमसीचे कर्मचारी आणि तुर्भे विभाग कार्यालयातील कर्मचारी यांची चौकशी करण्यात यावी, अशी मागणी केली जात आहे.

## सतर्कता जागरूकता सप्ताह अंतर्गत ग्रामसभेचे आयोजन

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

बँक ऑफ इंडिया, नवी मुंबई विभागीय कार्यालयाच्या वतीने केंद्रीय दक्षता आयोग यांच्या मार्गदर्शक सूचनांनुसार सतर्कता जागरूकता सप्ताहाच्या अनुषंगाने दिनांक ०६ ऑक्टोबर २०२६ रोजी १० ग्रामीण व निमशहरी शाखांमध्ये विविध ठिकाणी ग्रामसभांचे आयोजन करण्यात आले.

ह्या सभांमध्ये ३०० नागरिकांनी सहभाग नोंदवला. या उपक्रमाचा मुख्य उद्देश ग्राहक तसेच सर्वसामान्य नागरिकांमध्ये बँकिंग व्यवहारांतील दक्षता, सायबर फसवणूक प्रतिबंध आणि सुरक्षित डिजिटल बँकिंगबाबत जनजागृती निर्माण करणे हा होता. नवी मुंबई विभागा अंतर्गत अंबाडी, नेरे, उलवे, उरण, आसनगाव, शहापूर, वाकडपाडा, न्हावा शेवा , निळजे आणि गव्हाण या शाखांनी संबंधित ग्रामपंचायत, सार्वजनिक सभागृह, शाळा तसेच इतर सामुदायिक ठिकाणी ग्रामसभांचे आयोजन करून



ग्राहक व नागरिकांशी प्रत्यक्ष संवाद साधला.ग्रामसभांमध्ये प्रामुख्याने खालील महत्त्वाच्या बाबींविषयी जनजागृती करण्यात आली: ओटीपी कोणत्याही व्यक्तीसोबत शेअर करू नये.'डिजीटल ॲरेस्ट' सारख्या सायबर फसवणुकीच्या प्रकारां पासून सावध राहावे. ऑन लाईन लोन बाबत दक्ष राहावे आणि अनोळखी व्यक्ती/संस्थांना वैयक्तिक अथवा बँकिंग माहिती देऊ नये.मनी म्यूल खाती मध्ये अनोळखी व्यक्तींच्या सांगण्यावरून पैसे स्वीकारणे किंवा हस्तांतरित करणे टाळावे.फेक क्युआर कोड स्कॅम पासून सावध राहावे व पैसे प्राप्त करण्यासाठी क्युआर कोड स्कॅन करण्याची गरज नसते, याबाबत माहिती देण्यात आली. बनावट मोबाईल ॲप्स, संकेतस्थळे व फसव्या लिंक्स वर क्लिक किंवा डाउनलोड न करण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.सायबर फसवणूक झाल्यास तातडीने राष्ट्रीय सायबर क्राईम हेल्पलाईन क्रमांक १९३० वर संपर्क साधून तक्रार नोंदविण्याबाबत माहिती देण्यात आली.

या जनजागृती कार्यक्रमांमध्ये संबंधित शाखा व्यवस्थापक व शाखेतील कर्मचारी, तसेच सतर्कता अधिकारी श्री. के चैतन्य यांनी सक्रिय सहभाग घेतला. कार्यक्रमांचे आयोजन नवी मुंबई विभागाचे , विभागीय व्यवस्थापक श्री. बिरेंद्र कुमार गुप्ता यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच उप विभागीय व्यवस्थापक श्री. अंतर्यामी सारंगी यांच्या सहकार्याने करण्यात आले. या ग्रामसभांद्वारे ग्रामीण व निमशहरी भागातील ग्राहकांपर्यंत "सतर्क रहा, सुरक्षित रहा" हा संदेश पोहोचविण्यात आला असून, सुरक्षित आणि जबाबदार बँकिंग व्यवहारांबाबत नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी हा उपक्रम अत्यंत उपयुक्त ठरला.

# चला शाळेत जाऊया अभियानाचा शुभारंभ

## शिक्षण केवळ पदवीपुरते नव्हे, तर भाकरी व राष्ट्रभक्ती देणारे असावे -शिक्षणमंत्री दादा भुसे

**अलिबाग : प्रतिनिधी**

शिक्षण हे केवळ पदवीपुरते मर्यादित न राहता ते आनंददायी, भाकरी देणारे आणि विद्यार्थ्यांमध्ये प्रखर राष्ट्रभक्ती निर्माण करणारे असावे,असा महत्त्वाकांक्षी दृष्टिकोन राज्याचे शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी आज येथे मांडला.



अलिबाग येथील जिल्हा नियोजन समिती सभागृहात आयोजित विशेष कार्यक्रमात शालेय शिक्षण विभागातर्फे राबवल्या जाणाऱ्या 'चला शाळेत जाऊ या' अभियानाचा शुभारंभ करण्यात आला. या प्रसंगी शिक्षण क्षेत्राचा सर्वांगीण विकास, विद्यार्थ्यांची गुणवत्ता आणि शाळांमधील मूलभूत सुविधांचा कायापालट करण्यावर केंद्रवर्ती भर देण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पालकमंत्री भरतशेठ गोगावले उपस्थित होते. तसेच आमदार महेंद्र दळवी, माजी आमदार पंडीतशेठ पाटील, आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे, जिल्हा परिषद अध्यक्ष मंगेश वाकडीकर, उपाध्यक्ष मधुकर पाटील, शिक्षण सभापती चंद्रकांत कळंबे, महिला बाल कल्याण सभापती रसिका केणी, जिल्हाधिकारी किशन जावळे आणि मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले या मान्यवरांची विशेष उपस्थिती लाभली होती.

आपल्या मार्गदर्शनात शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे म्हणाले की, शाळांच्या प्रगतीसाठी आणि विद्यार्थ्यांना शिक्षणप्रवाहात टिकवून ठेवण्यासाठी राज्यात 'चला शाळेत जाऊ या' अभियान प्रभावीपणे राबवले जात आहे. मोबाईलच्या अतिवापरामुळे विद्यार्थ्यांमधील कमी होत चाललेली शारीरिक हालचाल विचारात



घेऊन दर शनिवारी देशभक्तीपर गीतांवर आधारित कवायतींचा 'आनंददायी शनिवार' उपक्रम सुरू करण्यात आला आहे. या उपक्रमात एकाच वेळी दोन कोटींहून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवून जागतिक विक्रम रचल्याचा गौरवपूर्ण उल्लेख त्यांनी केला.

विद्यार्थ्यांच्या शारीरिक व बौद्धिक विकासासाठी 'मिशन आरंभ'द्वारे पायाभूत साक्षरता, गणिती कौशल्ये आणि सामूहिक पाढे पाठांतरावर भर दिला जाणार आहे. तसेच मोबाईल स्क्रीन टाईम नियंत्रित करण्यासाठी विद्यार्थ्यांना मोबाईलवर गृहपाठ देणे पूर्णपणे बंद करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे.

ते म्हणाले, विद्यार्थ्यांच्या आरोग्यासाठी आरोग्य विभागाच्या सहकार्याने प्रत्येक बालकाची सखोल तपासणी करून 'हेल्थ कार्ड' दिले जाईल. मुलींसाठी शाळांमध्ये सॅनिटरी नॅपकिन व्हेंडिंग मशीन, विश्रांतीसाठी 'फुलराणी कक्ष' आणि ९ ते १४ वयोगटातील मुलींसाठी कर्करोग प्रतिबंधात्मक (HPV) लसीकरण मोहीम राबवली जाणार आहे. 'मिशन अभय'अंतर्गत बालसुरक्षा, गुड टच-बॅड टच आणि सायबर सुरक्षेचे धडे दिले जातील.क्रीडागुणांना प्रोत्साहन देण्यासाठी 'आनंद गुरुकुल क्रीडा प्रबोधिनी'ची स्थापना केली जाणार असून, प्रतिभावान विद्यार्थ्यांसाठी 'सुपर १००' उपक्रम आणि इस्रो-नासासारख्या आंतरराष्ट्रीय विज्ञान संस्थांच्या अभ्यास दौऱ्यांचे आयोजन केले जाईल.

पालकमंत्री भरतशेठ गोगावले यांनी आपल्या मनोगतातून शिक्षकांच्या पाठीवर कौतुकाची थाप मारली. "मी आज ज्या पदावर पोहोचलो आहे, त्याचे संपूर्ण श्रेय माझ्या आई-वडिलांना आणि मला घडवणाऱ्या शिक्षकांना जाते," अशा शब्दांत त्यांनी कृतज्ञता व्यक्त केली. देवाची ओळख करून देणारा गुरू हा देवापेक्षाही श्रेष्ठ असतो, हा दाखला देत त्यांनी शिक्षकांचे समाजकार्यातील महत्त्व अधोरेखित केले.

या सोहळ्यात नवोदय परीक्षा, स्काऊट-गाईड, बॅच लीडर अशा स्पर्धांमध्ये उज्ज्वल यश संपादन केलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा तसेच शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या 'आयडॉल' शिक्षकांचा विशेष सन्मान करण्यात आला.

# माणगावात द.ग.तटकरे कॉलेजमध्ये नवीन मतदार नोंदणी अभियान



**माणगाव : प्रतिनिधी**

माणगावात भारत निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शनानुसार नवीन मतदारांची नोंदणी व्हावी आणि युवकांमध्ये मतदानाबाबत जनजागृती निर्माण व्हावी, या उद्देशाने माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. राजीव साबळे यांच्या मार्गदर्शनाखाली माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाचे द.ग.तटकरे महाविद्यालय,माणगाव येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने नुकताच नवीन मतदार नोंदणी अभियान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.



या अभियानासाठी भारत निवडणूक आयोगाच्या वतीने उपस्थित राहिलेले डॉ.अरविंद घेमुड महसूल नायब तहसीलदार यांनी विद्यार्थ्यांना मतदार नोंदणी प्रक्रियेबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. नवीन मतदार म्हणून नोंदणी करण्याची प्रक्रिया, आवश्यक कागदपत्रे, मतदार यादीतील नावाची तपासणी तसेच मतदानाचे महत्त्व याबाबत त्यांनी विद्यार्थ्यांना माहिती दिली. १८ वर्षे पूर्ण झालेल्या विद्यार्थ्यांनी मतदार म्हणून नोंदणी करून लोकशाही प्रक्रियेत सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहनही त्यांनी केले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जयशंकर पांडेय यांनी यावेळी विद्यार्थ्यांना मतदानाचा अधिकार, लोकशाही व्यवस्थेतील मतदारांची भूमिका आणि जबाबदार नागरिक म्हणून मतदानाचे महत्त्व याबाबत मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत मतदार नोंदणी अभियानाचा लाभ घेतला. राष्ट्रीय सेवा योजना विभागप्रमुख प्रा. डॉ. राजेंद्र आचार्य, प्रा.सुष्मिता म्हामुणकर यांनी अभियानाचे आयोजन केले.नवीन मतदारांना मतदार नोंदणी प्रक्रियेची प्रत्यक्ष माहिती मिळाल्याने विद्यार्थ्यांमध्ये लोकशाही मूल्ये आणि मतदानाच्या अधिकाराबाबत जागरूकता निर्माण झाली. नवीन मतदार नोंदणी ही लोकशाही प्रक्रियेत युवकांच्या सक्रिय सहभागाची महत्त्वपूर्ण सुरुवात आहे,असा संदेश या अभियानातून देण्यात आला.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी राष्ट्रीय सेवा योजना विभागातील सर्व विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.या कार्यक्रमाला सूरज पुरोहित ग्राम महसूल अधिकारी, शिक्षक - शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# महिला शेतकऱ्यांना मिळणार आता अधिकृत ओळख

## कृषी विभागाकडून नोंदणीचे आवाहन!



**धाटाव : प्रतिनिधी**

महिला सक्षमीकरणाला बळ देण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागामार्फत महिला शेतकरी नोंदणी अभियान राबविण्यात येत आहे. महिला सक्षमीकरण अधिनियम २०२६ अंतर्गत शेती आणि शेतीवर आधारित व्यवसायांमध्ये काम करणाऱ्या महिलांना महिला शेतकरी प्रमाणपत्र देण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. या उपक्रमामुळे शेतीत प्रत्यक्ष योगदान देणाऱ्या महिलांना अधिकृत ओळख मिळण्यास मदत होणार असून, कृषी विभागाच्या विविध योजना, अनुदाने आणि लाभ मिळविण्याचा मार्गही सुकर होणार आहे.

अनेक महिला प्रत्यक्ष शेतात काम करतात; मात्र जमिनीचा सातबारा त्यांच्या नावावर नसल्यामुळे त्यांना शेतकरी म्हणून अधिकृत ओळख मिळविताना अडचणी येतात. अशा महिलांसाठी महिला शेतकरी प्रमाणपत्र महत्त्वाचे ठरणार आहे. सातबारा उताऱ्यावर नाव नसले तरी हे प्रमाणपत्र मिळू शकते, अशी माहिती रोहा तालुका कृषी विभागानचे तालुका कृषी अधिकारी महादेव करे यांनी प्रसिद्ध केलेल्या जनजागृती संदेशातून देण्यात आली आहे.

या प्रमाणपत्रामुळे महिलांची शेतकरी म्हणून अधिकृत ओळख निर्माण होण्यास मदत होईल. तसेच कृषी विभागाच्या विविध शासकीय योजना, अनुदाने आणि शेतीपूरक व्यवसायांसाठी उपलब्ध असलेल्या लाभांची माहिती मिळविणे व त्यांचा लाभ घेणे सुलभ होऊ शकते.

रोहा तालुका कृषी अधिकारी यांनी तालुक्यातील सर्व महिला शेतकरी भगिनींना आपल्या जवळच्या सामायिक सुविधा केंद्रात (CSC) जाऊन महिला शेतकरी प्रमाणपत्रासाठी नोंदणी प्रक्रिया पूर्ण करण्याचे आवाहन केले आहे. शेती तसेच शेतीवर आधारित व्यवसायांमध्ये काम करणाऱ्या पात्र महिलांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन कृषी विभागाकडून करण्यात आले आहे.

महिलांनी वेळेत नोंदणी पूर्ण करून शेतकरी प्रमाणपत्र मिळविण्यासाठी पुढाकार घ्यावा. महिला शेतकऱ्यांना शासकीय योजनांच्या प्रवाहात आणणे, त्यांना अधिकृत ओळख मिळवून देणे आणि शेती क्षेत्रातील त्यांचे योगदान अधोरेखित करणे, हा या उपक्रमाचा महत्त्वाचा उद्देश आहे.

# ग्रामपंचायत तिसे येथे सेवा संकल्प अभियानांतर्गत महिला शेतकऱ्यांना शासकीय योजनांची माहिती



**धाटाव : प्रतिनिधी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त संपूर्ण महाराष्ट्रात १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत 'सेवा संकल्प अभियान' राबविण्यात येत आहे. या अभियानाच्या माध्यमातून शासकीय योजनांची माहिती तळागाळातील नागरिकांपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने पंचायत समिती रोहा यांच्या वतीने तालुक्यातील विविध ग्रामपंचायतींमध्ये जनजागृती कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. याच उपक्रमांतर्गत ग्रामपंचायत तिसे येथे महिला व शेतकऱ्यांसाठी मार्गदर्शन कार्यक्रम पार पडला.

पंचायत समिती रोहाच्या सभापती विजया पाशीलकर यांच्या अध्यक्षतेखाली या कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले होते. ग्रामपंचायत प्रशासक राखी खोपकर यांनी उपस्थितांचे स्वागत केले. यावेळी कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांनी विविध शासकीय योजनांची माहिती देत नागरिकांना योजनांचा लाभ घेण्यासाठी मार्गदर्शन केले.

कृषी अधिकारी रणजीत लवटे यांनी महाराष्ट्र शासनाच्या महाराष्ट्र महिला शेतकरी सशक्तीकरण अधिनियम २०२६ संदर्भात उपस्थित महिलांना सविस्तर माहिती दिली. महिला शेतकऱ्यांनी प्रमाणपत्र कसे मिळवावे, त्यासाठी कोणती प्रक्रिया पूर्ण करावी आणि या प्रमाणपत्राच्या माध्यमातून कोणत्या योजनांचा लाभ घेता येईल, याबाबत त्यांनी मार्गदर्शन केले. तसेच प्रधानमंत्री सूर्यघर योजनेची माहिती देतानाच अल निनोच्या संभाव्य प्रभावामुळे शेतीसमोर निर्माण होणाऱ्या आव्हानांना कसे सामोरे जावे, याविषयीही त्यांनी मार्गदर्शन केले. कृषी सहाय्यक श्रीमती सावंत यांनी कृषी विभागाच्या विविध योजनांची माहिती उपस्थितांना दिली.

पंचायत समिती सदस्य जगन्नाथ धनावडे यांनी, शासकीय योजनांचा लाभ मिळविण्यासाठी महिलांना वारंवार कार्यालयांचे उंबरठे झिजवावे लागू नयेत, यासाठी अधिकाऱ्यांनी नागरिकांच्या घरापर्यंत पोहोचून त्यांना सुलभ पद्धतीने लाभ मिळवून देण्यावर भर द्यावा, अशा सूचना केल्या.पंचायत समितीचे उपसभापती संजय मांडलुस्कर यांनी शासनाच्या योजना थेट जनतेपर्यंत पोहोचत असल्याचे नमूद करून ग्रामस्थांनीही पुढाकार घेत जास्तीत जास्त शासकीय योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्ष विजया पाशीलकर यांनी महिला शेतकऱ्यांना शेतकरी प्रमाणपत्र काढण्याचे आवाहन केले. या प्रमाणपत्राच्या माध्यमातून पीककर्ज, पीकविमा, गोपीनाथ मुंडे अपघात विमा योजना तसेच कृषी निविष्ठा वाटप यांसारख्या विविध योजनांचा लाभ घेण्याबाबत त्यांनी मार्गदर्शन केले. याशिवाय, लोकसहभागातून जास्तीत जास्त वनराई बंधारे उभारून जलसंधारणाच्या कामांना चालना द्यावी, असेही त्यांनी सांगितले.

शासकीय योजनांची माहिती थेट ग्रामपातळीवर पोहोचवून महिला शेतकऱ्यांचे सक्षमीकरण, कृषी योजनांचा प्रभावी लाभ आणि जलसंधारणाच्या कामांना प्रोत्साहन देणे, हा या अभियानाचा प्रमुख उद्देश असल्याचे या कार्यक्रमातून अधोरेखित झाले.

# शिक्षक सेवक पतपेढीची निवडणूक बिनविरोध

## चेअरमनपदी स्मिता पाबरेकर, व्हाईस चेअरमनपदी परेश अंधेरे

**माणगाव : बातमीदार**

रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षक सेवकांची सहकारी पतपेढी लिमिटेड, माणगाव या संस्थेच्या चेअरमन आणि व्हाईस चेअरमनपदाच्या निवडी गुरुवारी (८ऑक्टोबर) पार पडल्या. या निवडीत महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद, शाखा माणगावच्या महिला आघाडी प्रमुख स्मिता राजेश पाबरेकर यांची चेअरमनपदी, तर शिक्षक परिषदेचे उपाध्यक्ष परेश अंधेरे यांची व्हाईस चेअरमनपदी बिनविरोध निवड करण्यात आली.



माणगाव तालुका प्राथमिक शिक्षक समविचारी संघटना पॅनलच्या वतीने ही निवड करण्यात आली. निवडीनंतर उपस्थित मान्यवरांनी नवनियुक्त चेअरमन स्मिता पाबरेकर आणि व्हाईस चेअरमन परेश अंधेरे यांचे अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

या वेळी पॅनल प्रमुख तथा शिक्षक नेते संजय निजापकर, जिल्हाध्यक्ष तथा पॅनल प्रमुख उदय गायकवाड, प्रकाश उभारे, जितेंद्र बोडके, सुजित भोजने, ज्येष्ठ संचालक संदीप शिंदे, रमेश उभारे, संजय पाटोळे, संदीप साळवी, ज्योती दांडेकर, सचिन गंगावणे, राकेश मढवी आणि तज्ज्ञ संचालक गजानन देवकर उपस्थित होते.

तसेच माजी तालुकाध्यक्ष गणेश निजापकर, माजी चेअरमन सायरा बानू चौगुले, अपर्णा जंगम, राखी देसाई, लीना मगर, विजय शिंदे, राजेश पाबरेकर, हेमंत बारटक्के, मुकेश भोसतेकर, चंद्रकांत भोजने यांच्यासह अन्य शिक्षक व मान्यवर उपस्थित होते.

रायगड जिल्हा प्राथमिक शिक्षक सेवकांची पतपेढी ही स्वयंपूर्ण असून फक्त स्वभांडवलातून सभासदांना कर्जपुरवठा करणारी जिल्ह्यातील एकमेव पतसंस्था आहे. पतसंस्थेला ५२वर्ष पूर्ण झाली असून सभासदांना या वर्षी १२ टक्के लाभांश दिला आहे. अशा प्रगतीशील संस्थेच्या चेअरमन पदी सौ. पाबरेकर व व्हॉईस चेअरमन पदी श्री. अंधेरे यांची नियुक्ती झाल्याबद्दल सभासदांनी आनंद व्यक्त केला.

# मोहोपाडा येथे महावितरणचे ग्राहक तक्रार निवारण व सेवा सेतू शिबिर

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

महावितरणच्या मोहोपाडा कार्यालयात शुक्रवार, दि. ९ ऑक्टोबर रोजी ग्राहक तक्रार निवारण व सेवा सेतू शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात वीज ग्राहकांच्या विविध तक्रारींची दखल घेऊन अनेक तक्रारींचे निराकरण करण्यात आले. तसेच प्रलंबित तक्रारींचा निपटारा करण्यासाठी संबंधित कार्यालयीन कर्मचाऱ्यांना आवश्यक निर्देश देण्यात आले.

या शिबिराच्या माध्यमातून ग्राहकांना वीजसेवेशी संबंधित समस्या मांडण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आली. ग्राहकांच्या तक्रारींचे वेळेत निराकरण व्हावे, तसेच भविष्यातील तक्रारी कमी करण्यासाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशा सूचना संबंधित कर्मचाऱ्यांना देण्यात आल्या.

यावेळी स्मार्ट सोलर योजनेबाबत ग्राहकांना माहिती देण्यात आली. या योजनेचे स्वरूप आणि फायदे समजावून सांगतानाच स्मार्ट मीटरच्या कार्यपद्धतीबाबतही मार्गदर्शन करण्यात आले. स्मार्ट मीटरसंदर्भात ग्राहकांच्या मनातील विविध शंकांचे निरसन करून त्याचे फायदे स्पष्ट करण्यात आले.

मोहोपाडा परिसरात गेल्या दोन महिन्यांपासून वीजपुरवठा सुरळीत सुरू असल्याबद्दल ग्राहक प्रतिनिधींनी समाधान व्यक्त केले. वीजपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी प्रयत्नशील असलेले महावितरणचे सहाय्यक अभियंता किशोर पवार आणि त्यांच्या तांत्रिक कर्मचाऱ्यांचे यावेळी विशेष अभिनंदन करण्यात आले.

वीजपुरवठा सुरळीत राहिल्याने ग्राहकांना दिलासा मिळाला असून, महावितरणच्या कर्मचाऱ्यांनी यापुढेही ग्राहकांना दर्जेदार सेवा द्यावी, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.या शिबिरामुळे ग्राहक आणि महावितरण प्रशासन यांच्यात थेट संवाद साधण्याची संधी मिळाली. ग्राहकांच्या समस्या जाणून घेऊन त्यांचे वेळेत निराकरण करण्यासाठी अशा शिबिरांचे आयोजन उपयुक्त ठरत आहे.

# न्यूझीलंडविरुद्ध पाच दिग्गजांचे पुनरागमन

## टीम इंडियात मोठे बदल



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय क्रिकेट संघ २२ ऑक्टोबरपासून न्यूझीलंड दौऱ्याला सुरुवात करणार आहे. या दौऱ्यात सर्वप्रथम पाच सामन्यांची टी-२० मालिका खेळवली जाणार असून त्यासाठी भारतीय संघ जाहीर झाला आहे. एकदिवसीय आणि कसोटी संघ अद्याप जाहीर झालेला नाही. पुढील आठवड्यात निवड समितीची बैठक होणार असून त्यानंतर पाच वनडे आणि दोन कसोटी सामन्यांसाठी संघ जाहीर होण्याची शक्यता आहे. एका वृत्तानुसार वेस्ट इंडिजविरुद्धच्या वनडे मालिकेत खेळू न शकलेले पाच प्रमुख खेळाडू न्यूझीलंडविरुद्ध कमबॅक करू शकतात.

यामध्ये उपकर्णधार श्रेयस अय्यर, वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराह, अष्टपैलू वॉशिंग्टन सुंदर आणि अक्षर पटेल तसेच अनुभवी मोहम्मद शमी यांचा समावेश आहे. आशियाई क्रीडा स्पर्धेतील (२०२६) व्यस्ततेमुळे श्रेयस, बुमराह आणि अक्षर यांना वेस्ट इंडिजविरुद्ध खेळता आले नव्हते. २०२७ च्या वनडे विश्वचषकाच्या तयारीच्या दृष्टीने बुमराहचा अनुभव महत्त्वाचा मानला जात आहे. वॉशिंग्टन सुंदरला आगामी कसोटी मालिकेच्या दृष्टीने तयार करण्यावर भर असू शकतो.

अक्षरच्या अनुपस्थितीत रवींद्र जडेजाला संधी मिळाली होती, मात्र त्याला अपेक्षित प्रभाव पाडता आला नाही. त्यामुळे अक्षरचे पुनरागमन निश्चित मानले जात आहे, तर भुवनेश्वर कुमारने टी-२० संघात कमबॅक केल्यानंतर शमीच्या निवडीबाबतच्या अपेक्षा वाढल्या आहेत. देशांतर्गत क्रिकेटमध्ये शमीने चांगली कामगिरी केली असून वेस्ट इंडिजविरुद्ध युवा गोलंदाज अपयशी ठरल्याने निवड समिती अनुभवी पर्यायाकडे पाहू शकते.

**भारताचा संभाव्य वनडे संघ :** रोहित शर्मा, विराट कोहली, शुभमन गिल (कर्णधार), श्रेयस अय्यर (उपकर्णधार), के. एल. राहुल, यशस्वी जैस्वाल, ऋतुराज गायकवाड, अक्षर पटेल, रवींद्र जडेजा, नितीश कुमार रेड्डी, कुलदीप यादव, जसप्रीत बुमराह, मोहम्मद सिराज, गुरनूर ब्रार आणि मोहम्मद शमी.

# न्यूझीलंडचे दोन स्टार खेळाडू मालिकेबाहेर

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारताविरुद्धच्या टी-२० मालिकेपूर्वी न्यूझीलंड संघाला दोन मोठे धक्के बसले असून दुखापतींमुळे स्टार खेळाडू मार्क चॅपमन आणि झॅक फोक्स यांना मालिकेतून बाहेर पडावे लागले आहे. चॅपमनला मांडीच्या स्नायूंची दुखापत झाली आहे, तर फोक्सला हिप इंज्युरीचा त्रास होत आहे. त्यांच्या जागी अष्टपैलू खेळाडू जोश क्लार्कसन आणि वेगवान गोलंदाज ब्लेअर टिकनर यांचा संघात समावेश करण्यात आला आहे.

टी-२० मालिकेतील पहिला सामना २२ ऑक्टोबर रोजी होणार आहे. गेल्या महिन्यात युरोपियन टी-२० लीगमध्ये खेळताना मार्क चॅपमनला हॅमस्ट्रिंगची दुखापत झाली होती. मात्र, भारतासोबतच्या वन-डे मालिकेसाठी तो वेळेत बरा होईल अशी अपेक्षा आहे. दुसरीकडे, सराव सत्रादरम्यान फोक्सच्या उजव्या नितंबाला दुखापत झाली. या दुखापतीमुळे त्याला



मालिकेतून बाहेर पडावे लागले असून तो कधीपर्यंत बरा होईल याबद्दल कोणतीही निश्चितता नाही. न्यूझीलंडचे मुख्य प्रशिक्षक वॉल्टर यांनी मार्क चॅपमन आणि झॅक फोक्स यांच्या दुखापतींबद्दल निराशा व्यक्त केली आणि ते लवकर बरे व्हावेत अशी इच्छा व्यक्त केली. तरीही जोश क्लार्कसन आणि ब्लेअर टिकनर यांसारखे अनुभवी खेळाडू संघात उपलब्ध असल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले.

या वर्षाच्या सुरुवातीला झालेल्या पुरुषांच्या टी-२० विश्वचषकाच्या अंतिम सामन्यात भारताने न्यूझीलंडचा ९६ धावांनी पराभव केला होता. आता या दोन संघांमध्ये पाच सामन्यांची टी-२० मालिका खेळली जाणार आहे. पहिला आणि दुसरा सामना २२ आणि २४ ऑक्टोबर रोजी क्राइस्टचर्चमध्ये होणार आहे. त्यानंतर, तिसरा सामना २७ ऑक्टोबरला वेलिंग्टनमध्ये, चौथा ३० ऑक्टोबरला ऑकलंडमध्ये आणि अंतिम सामना १ नोव्हेंबरला हॅमिल्टनमध्ये खेळवला जाईल. बीसीसीआयने नुकताच या टी-२० मालिकेसाठी संघाची घोषणा केली आहे.

**न्यूझीलंडचा संघ :** मिचेल सँटनर (कर्णधार), फिन ॲलन, मायकल ब्रेसवेल, जोश क्लार्कसन, डेव्हन कॉनवे, जेकब डफी, लॉकी फर्ग्युसन, मॅट हेन्री, बेव्हन जेकब्स, काईल जेमिसन, ॲडम मिल्ने, डॅरिल मिचेल, ग्लेन फिलिप्स, टिम सायफर्ट, नॅथन स्मिथ, ब्लेअर टिकनर.

# नांदगाव हायस्कूलचे कबड्डीत यश




**मुरुड : प्रतिनिधी**

मेहबूब विहूर येथे आयोजित करण्यात आलेल्या पावसाळी कबड्डी क्रीडा स्पर्धेत यशवंतनगर नांदगाव हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी करत घवघवीत यश संपादन केले. शाळेच्या खेळाडूंनी आपल्या जिद्द, चिकाटी आणि सांघिक खेळाच्या जोरावर स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी केली.

या स्पर्धेत शाळेने पुढीलप्रमाणे यश संपादन केले. १७ वर्षांखालील मुली-प्रथम क्रमांक, १४ वर्षांखालील मुले-प्रथम क्रमांक आणि १७ वर्षांखालील मुले-तृतीय क्रमांक. या यशामुळे विद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला असून जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी पात्र ठरलेल्या खेळाडूंना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. विद्यार्थ्यांच्या या यशामागे मार्गदर्शक शिक्षक दत्तात्रेय खुळपे, सागर राऊत, महेश वाडकर तसेच शिक्षिका शिल्पा कळके आणि बांद्रे यांचे मोलाचे मार्गदर्शन व परिश्रम लाभले. सर्व क्रीडा शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या सरावासाठी घेतलेल्या मेहनतीचे कौतुक करण्यात आले.

या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष फैरोज घलटे, मुख्याध्यापिका अर्चना खोत, पर्यवेक्षक प्रतीक पेडणेकर, शिक्षक प्रतिनिधी राहील घलटे आणि शिक्षकेतर प्रतिनिधी संतोष बुल्लू यांनी विजयी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन केले. विद्यालयाच्या या यशामुळे शाळेच्या क्रीडा क्षेत्रातील प्रगतीला नवी दिशा मिळाली असून विद्यार्थ्यांच्या पुढील यशासाठी सर्व स्तरांतून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# विभागीय कुस्ती स्पर्धेत सीकेटीच्या विद्यार्थ्यांची चमक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

क्रीडा व युवक संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत



जिल्हा क्रीडा परिषद व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने कारमेल स्कूल खोपोली येथे झालेल्या मुंबई विभागीय शालेय कुस्ती स्पर्धेत जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयातील जितेश अर्जुन सुरते (इ. ११ वी) व सुदेश हरिश्चंद्र बैदू (इ. १२ वी) या विद्यार्थ्यांनी द्वितीय क्रमांक प्राप्त केला.

विभागीय कुस्ती स्पर्धेतील या दोन्ही विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या यशाबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, अध्यक्ष अरुणशेठ भगत, सचिव एस. टी. गडदे, प्राचार्य प्रशांत मोरे, पर्यवेक्षक अजित सोनवणे, पर्यवेक्षिका स्वाती पाटील, क्रीडा शिक्षक अरुण पाटील, मनोज पाटील, माधवी कोळी तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी या सर्वांनी त्यांचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# पहिल्याच राष्ट्रीय स्पर्धेत होमी कलाटेचे रौप्यपदक

**पिंपरी-चिंचवड : प्रतिनिधी**

राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत पहिल्यांदाच सहभागी होत रौप्यपदक पटकावण्याची उल्लेखनीय कामगिरी होमी कलाटे याने केली असून हैदराबाद येथे झालेल्या अखिल भारतीय सीआयएससीई राष्ट्रीय स्पर्धेत मिळवलेल्या या यशामुळे पिंपरी-चिंचवड शहराच्या क्रीडा लौकिकात भर पडली आहे. होमी हा भारतीय



जनता पार्टीचे नगरसेवक राहुल कलाटे यांचा सुपुत्र आहे. अखिल भारतीय सीआयएससीई राष्ट्रीय स्पर्धेतील होमीचा हा पहिलाच सहभाग होता.

त्यामुळे पदार्पणातच मिळवलेले रौप्यपदक त्याच्या क्रीडा वाटचालीतील महत्त्वाचा टप्पा ठरले आहे. राष्ट्रीय व्यासपीठावर आपली क्षमता सिद्ध करत त्याने पुढील वाटचालीसाठी आत्मविश्वास देणारे यश मिळवले आहे. होमीच्या या कामगिरीबद्दल राहुल कलाटे यांनी सोशल मीडियावरून आनंद आणि अभिमान व्यक्त केला. मुलाचे मनःपूर्वक अभिनंदन करताना, पहिल्याच राष्ट्रीय स्पर्धेत पदक मिळवल्यामुळे हा आनंद अधिक विशेष असल्याचे त्यांनी नमूद केले. सातत्याने मेहनत करत राहण्याचा आणि स्वतःच्या क्षमतेवर विश्वास ठेवण्याचा संदेशही त्यांनी होमीला दिला. ही कामगिरी पुढील अनेक विजयांची सुरुवात ठरावी, अशा शुभेच्छा राहुल कलाटे यांनी व्यक्त केल्या आहेत.

त्यांच्या संदेशातून मुलाच्या यशाचा अभिमान आणि त्याच्या पुढील क्रीडा प्रवासाला प्रोत्साहन देण्याची भावना दिसून येते.होमीचे हे यश पिंपरी-चिंचवडमधील युवा खेळाडूंसाठी प्रेरणादायी आहे. राष्ट्रीय स्तरावर पदार्पण करतानाच पदक मिळवणे ही वैयक्तिक यशाबरोबरच शहरासाठीही अभिमानाची बाब आहे. शालेय जीवनात खेळाची आवड जोपासणाऱ्या विद्यार्थ्यांसमोर त्याच्या कामगिरीने एक उत्साहवर्धक उदाहरण उभे केले आहे. रौप्यपदकाच्या या यशाने होमीच्या पुढील क्रीडा प्रवासाला आशादायी सुरुवात झाली असून आगामी स्पर्धांमध्ये आणखी सरस कामगिरी करून पिंपरी-चिंचवडचा नावलौकिक वाढवण्याची संधी त्याच्यासमोर आहे.

# इशान किशन ठरला चौकारांचा राजा

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

एका कॅलेंडर वर्षात टी-२० प्रकारात सर्वाधिक चौकार



लगावणाऱ्या फलंदाजांच्या यादीत इशान किशनने भरारी घेतली आहे. इशानने यशस्वी जैस्वालला मागे टाकत हा विक्रम नावावर केला आहे. इशानने वेस्ट इंडिजविरुद्धच्या पहिल्या टी-२० लढतीत ३७ धावांची खेळी केली होती. या खेळीदरम्यान त्याने ५ चौकार लगावले. ५ चौकारांसह टी-२० प्रकारात भारतातर्फे कॅलेंडर वर्षात सर्वाधिक चौकार लगावणारा फलंदाज ठरला. आतापर्यंत हा विक्रम यशस्वी जैस्वालच्या नावावर होता.

२०२६ मध्ये इशानने १६७ चौकार लगावले आहेत. २०२३ मध्ये यशस्वी जैस्वालने १६५ चौकार लगावले होते. या यादीत तिसऱ्या स्थानी अभिषेक शर्मा आहे. त्याने २०२५ मध्ये १५८ चौकार लगावले होते. भारतीय संघाचा माजी कर्णधार विराट कोहलीने २०१६ मध्ये १५३ चौकार लगावले होते. यादीत पुन्हा एकदा अभिषेक शर्माचंही नाव आहे. २०१८ मध्ये शिखर धवनने १२९ चौकार लगावले होते. या यादीत आठव्या आणि नवव्या स्थानी सूर्यकुमार यादव आणि ऋषभ पंत आहेत.

# जीत रावलची फर्स्ट क्लास क्रिकेटमधून निवृत्ती

**मुंबई : प्रतिनिधी**

न्यूझीलंडचा क्रिकेटपटू जीत रावल याने फर्स्ट क्लास क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर केली आहे. तो गुजरातमध्ये जन्मलेला असला तरी त्याने न्यूझीलंडकडून २०१६ ते २०२० या काळात २४ कसोटी सामने खेळले होते. विशेष म्हणजे जीत रावल आणि भारताचा माजी यष्टीरक्षक फलंदाज पार्थिव पटेल यांनी शालेय क्रिकेटमध्ये एकत्र सलामीला फलंदाजीदेखील केली होती.



जीत रावल सप्टेंबरमध्ये ३८ वर्षांचा झाला. त्याने डिसेंबर २००८ मध्ये फर्स्ट क्लास क्रिकेटमध्ये पदार्पण केले होते. आता जवळपास १८ वर्षांच्या कारकिर्दीनंतर त्याने क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर केली आहे. त्याने लहानपणी भारतात क्रिकेट खेळायला सुरुवात केली. त्यानंतर तो कुटुंबासह न्यूझीलंडमध्ये स्थायिक झाला. न्यूझीलंडकडून खेळण्याचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी त्याच्या वडिलांनी कुटुंबासह तिथे जाण्याचा निर्णय घेतला होता. नॉर्दर्न डिस्ट्रिक्ट्स क्रिकेट असोसिएशनशी बोलताना जीतने सांगितले की, न्यूझीलंडकडून खेळणे हे त्याचे आणि त्याच्या वडिलांचे स्वप्न होते. हे स्वप्न पूर्ण करता आले याचा त्याला आनंद आणि अभिमान आहे.

जीत रावल आणि पार्थिव पटेल हे दोघेही अहमदाबादमधील विद्यानगर शाळेसाठी क्रिकेट खेळायचे. त्या वेळी दोघेही सलामीला फलंदाजी करायचे. पुढे जीत न्यूझीलंडमध्ये गेला आणि तिथल्या देशांतर्गत क्रिकेटमध्ये त्याने आपली वेगळी ओळख निर्माण केली.जीतने प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये सलामीवीर म्हणून मोठी कामगिरी केली. त्याने २९२ डावांपैकी २८५ डावांत सलामीला फलंदाजी केली. या काळात त्याने १० हजारांहून अधिक धावा केल्या. त्याच्या नावावर प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये १०,१२७ धावा आणि २३ शतके आहेत. जीतने न्यूझीलंडच्या देशांतर्गत क्रिकेटमध्ये नॉर्दर्न डिस्ट्रिक्ट्स संघाचे नेतृत्वही केले. त्याने यंदा मार्चमध्ये प्लंकेट शिल्ड स्पर्धेत शेवटचा सामना खेळला. आता निवृत्तीच्या निर्णयानंतर त्याच्या क्रिकेट कारकिर्दीचा प्रवास थांबला आहे.

# विराटच्या जागी मला कर्णधार करणार होते

## पार्थिव पटेलचा खळबळजनक खुलासा

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**



माजी भारतीय क्रिकेटपटू आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूचा माजी यष्टीरक्षक पार्थिव पटेलने विराट कोहली आणि आरसीबीबाबत मोठा खुलासा केला आहे. त्यामुळे क्रिकेट वर्तुळात खळबळ उडाली आहे. माजी क्रिकेटपटू आकाश चोप्रासोबतच्या एका पॉडकास्टमध्ये पार्थिव म्हणाला, "आशिष नेहरा आणि गॅरी कर्स्टन यांनी मला सांगितले होते की, मी विराटची जागा कर्णधार म्हणून घेईन."

नेहरा २०१८ आणि २०१९ मध्ये आरसीबीचे गोलंदाजी प्रशिक्षक होते, तर कर्स्टन मुख्य प्रशिक्षक होते. २०१९ च्या हंगामात आरसीबी गुणतालिकेत तळाशी राहिली आणि परिणामी दोघांनाही पदावरून हटवण्यात आले. २०२० च्या हंगामासाठी माईक हेसन आणि सायमन कॅटिच यांनी पदभार स्वीकारला आणि सर्व चित्र बदलले. पार्थिवने पुढे सांगितले की, "कर्णधारपदाच्या शर्यतीत मोईन अलीदेखील होता. मी याबद्दल कधीच बोललो नाही. मला सांगण्यात आले होते, 'तयार रहा, पुढच्या वर्षी तू कर्णधार होणार आहेस.' पण पुढच्या वर्षी नेहरा आणि कर्स्टन यांना जावे लागले. नवीन प्रशिक्षक आले आणि मला त्या संपूर्ण हंगामात एकही सामना खेळायला मिळाला नाही." २०२० मध्ये पार्थिवला एकही सामना खेळता आला नाही.

# यशस्वी जैस्वाल करतोय विकेटकीपिंगचा सराव



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

डोमेस्टिक क्रिकेटमध्ये धावांच्या राशी रचल्यानंतर यशस्वी जैस्वालसाठी भारतीय क्रिकेट संघाचे दरवाजे उघडले. कसोटी संघात सलामीवीर म्हणून स्थान पक्के केलेल्या यशस्वीसाठी वनडे आणि टी-२० संघातली जागा पक्की झालेली नाही. प्रचंड अशा चुरशीमुळे यशस्वी गेली काही वर्ष वनडे आणि टी२० संघात राखीव किंवा रिझर्व्ह खेळाडूंच्या यादीत दिसतो. विकेटकीपिंगचं तंत्र अवलंबल्यास कदाचित संघात पक्के स्थान मिळू शकते असा यशस्वीचा विचार असावा. कारण यशस्वी अलीकडे विकेटकीपिंगचा सराव करताना दिसत आहे.

मुंबई संघाचा कर्णधार सिद्धेश लाडने यासंदर्भात माहिती दिली. रणजी करंडक स्पर्धेचा नवा कोरा हंगाम काही दिवसात सुरू होतो आहे. ४२ जेतेपद नावावर असणाऱ्या मुंबई संघाच्या सलामीच्या लढतीपूर्वी सिद्धेशने प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. यशस्वी विकेटकीपिंगचा सराव करतो आहे हे खरं आहे. त्याला मुंबईसाठी आणि कदाचित भविष्यात भारतासाठी विकेटकीपिंगची जबाबदारी स्वीकारायची असावी असं सिद्धेश लाड म्हणाला. यशस्वीने सोशल मीडियावर शेअर केलेल्या रीलमध्ये तो विकेटकीपिंगचा सराव करतो आहे. यशस्वीबरोबर यासंदर्भात बोलणं झालेलं नाही त्यामुळे मला नक्की त्याच्या मनात काय आहे ते ठाऊक नाही असंही सिद्धेशने स्पष्ट केलं.

यशस्वी भारतासाठी ६ वनडे आणि २३ टी२० सामने खेळला आहे. वनडेत रोहित शर्मा आणि कर्णधार शुबमन गिल सलामीला येत असल्यामुळे यशस्वीसाठी जागा नाही. टी२० संघात संजू सॅमसन, अभिषेक शर्मा आणि वैभव सूर्यवंशी हे तिघेही उत्तम खेळत असल्यामुळे या संघातही यशस्वीला जागा नाही. कसोटी संघात यशस्वीने सलामीवीर म्हणून स्थान पक्के केले आहे.

# कोणत्याही क्रमांकावर खेळण्यास तिलक वर्मा तयार

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

काही दिवसांपूर्वीच आशियाई क्रीडा स्पर्धेत भारतीय संघाने फायनलमध्ये पाकिस्तानला नमवत सुवर्णपदकावर नाव कोरले. दडपणाच्या फायनलच्या लढतीत भारतातर्फे तिलक वर्माने २२ चेंडूत ५१ धावांची शानदार खेळी साकारली होती. सहाव्या क्रमांकावर खेळताना तिलकने निर्णायक खेळी साकारली. संघाचं संतुलन, सामन्याची स्थिती लक्षात घेऊन तिलकला वेगवेगळ्या क्रमांकावर पाठवण्यात येते.

त्याविषयी विचारले असता तिलक म्हणाला की, हे खरंच आव्हानात्मक आहे. सलामीला खेळणारा बॅट्समन तिसऱ्या किंवा चौथ्या क्रमांकावर खेळू शकतो. पण सलामीवीर किंवा तिसऱ्या-चौथ्या क्रमांकावर खेळणाऱ्या फलंदाजाला अचानक ६-७ क्रमांकावर खेळावं लागणं हे अवघड आहे. पण संघाची गरज असेल तर मग पर्याय नाही. देशाकडून खेळताना तुम्हाला जिथे संधी मिळेल तिथे खेळून जिंकून द्यायचं आहे. यासाठी अथक सराव करतो. विविध क्रमांकावर फलंदाजी करण्यासाठी मानसिकदृष्ट्या तयारी करतो.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com